सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २९ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३४९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यात १ एप्रिलपासून वीजदरात कपात

## महावितरणच्या पाच वर्षांच्या दरपत्रकाला आयोगाची मंजुरी

## १०० युनिटपर्यंतच्या वापरासाठी आता प्रति युनिट ७.१० रुपये मोजावे लागणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २८ मार्च :** राज्यातील लाखो वीज ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी असून, येत्या १ एप्रिलपासून वीजदरात कपात लागू होणार आहे. १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांसाठी प्रति युनिट दरात सुमारे एक रुपयाची कपात करण्यात आली असून, आता त्यांना ८.१४ रुपयांऐवजी ७.१० रुपये मोजावे लागणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या पाच वर्षांच्या वीजदर कपात याचिकेला मंजुरी दिल्याने हा मार्ग मोकळा झाला आहे.गेल्या वर्षभरापासून ही याचिका न्यायालयीन प्रक्रियेत अडकली होती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, तांत्रिक बाबींची पूर्तता करून आयोगाने आता नवा आदेश प्रसिद्ध केला आहे.

या निर्णयामुळे आगामी पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने वीजदर कमी होणार आहेत.




नवीन दरपत्रकानुसार, घरगुती ग्राहकांसाठी १०० ते ३०० युनिटपर्यंतचा दर १३.२३ रुपयांवरून १२.९४ पैसे इतका कमी झाला आहे. औद्योगिक ग्राहकांसाठीही दिलासा मिळाला असून, त्यांचा दर १०.८८ रुपयांवरून १०.७१ पैसे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांच्या सवलती महावितरणने कायम ठेवल्या आहेत. दरम्यान, पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी आयोगाने ई–वाहन चार्जिंग स्टेशनसाठी २०२६–२७ या वर्षासाठी ९.५० रुपये प्रति युनिट दर निश्र्चित केला आहे.

हा दर २०२८–२९ पर्यंत स्थिर राहणार आहे. यामुळे मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांना आपल्या आवारात लघुदाब चार्जिंग केंद्र सुरू करणे अधिक परवडणारे होणार आहे.राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणारवीज–दर कपातीबाबत गेले वर्षभर आयोग, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या पा–तळीवर विविध सुनावण्या झाल्या. आता संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करून आयोगाकडून आदेश आल्यामुळे स्पष्टता व निश्र्चितता आली आहे. वीजदर कपातीच्या आदेशामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

**–विश्वास पाठक,**
**स्वतंत्र संचालक, महावितरण**

# देशात इंधनाचा तुटवडा नाही

## तरीही पंतप्रधान मोदींची स्ट्रॅटर्जी तयार : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २८ मार्च :** जागतिक स्तरावर इंधनाचे मोठे संकट उभे ठाकलेले असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे भारताला त्याची झळ बसलेली नाही. देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी केंद्र सरकारची रणनीती तयार आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली. दरम्यान, इंधन टंचाई किंवा टाळेबंदीबाबत (लॉकडाऊन) चुकीच्या बातम्या आणि अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध राज्य सरकार कठोर कारवाई करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली होती.



या बैठकीनंतर शनिवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना फडणवीस बोलत होते. ते म्हणा–ले, जगातील अनेक विकसित देशांमध्ये इंधन संकटामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही देशांनी कामाचे दिवस कमी करून चार दिवसांचा आठवडा केला आहे, तर काहींनी सक्तीचे 'वर्क फ्रॉम होम' लागू केले आहे. मात्र, भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशी परिस्थिती उद्भवू दिली नाही. ज्या पद्धतीने त्यांनी या संकटाचे व्यवस्थापन केले, त्याचे कौतुक सर्वच मुख्यमंत्र्यांनी बैठकीत केले. आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाच्या किमती वाढूनही केंद्र सरकारने त्याचा भार स्वतः उचलल्याने सर्वसामान्यांना त्याची झळ बसली नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.देशात पुन्हा लॉकडाऊन लागणार आहे का, असे विचारले असता फडणवीस म्हणाले, काही लोक जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करत आहेत.

देशात किंवा राज्यात कुठेही लॉकडाऊन लागणार नाही. अशा अफवा पसरवणे हा एक प्रकारे देशद्रोहच आहे. अशा खोडसाळ प्रवृत्तींवर कठोर कारवाई केली जाई, असा इशारा त्यांनी दिला. राज्यात एलपीजी सिलिंडरचा पुरवठा ७५ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. भविष्यात सिलिंडरची टंचाई भासू नये म्हणून 'पीएनजी' (पाईप गॅस) जोडणी प्रक्रियेला गती दिली जात आहे. गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील अटी व शर्ती शिथील करण्यात आल्या आहेत. या संदर्भात राज्य सरकारने शासन निर्णय निर्गमित केला आहे. पाईप गॅसचा विस्तार झाल्यास घरगुती एलपीजीवरील अवलंबित्व कमी होईल, असा विश्र्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. देशात इंधनाचा पुरेसा साठा उप–लब्ध आहे आणि भविष्यासाठीही सरकारची तयारी पूर्ण आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि घाबरून जाऊ नये, असे आवाहन देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## थोडक्यात...

### गृहकर्जांची उपलब्धता वाढवण्याचे उद्दिष्ट

**मुंबई:** विव्हर सर्व्हिसेस प्रा. लिमिटेडने सेंट्रम कॅपिटल लिमिटेडकडून सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (सीएचएफएल) मधील ७५.०१% नियंत्रित भागभांडवल संपादन केले. ज्यामुळे संपूर्ण भारतातील घरापासून वंचित राहिलेल्या कुटुंबांसाठी घर मालकी अधिक सुलभ करण्यासाठी त्याची वचनबद्धता मजबूत झाली आहे. या व्यवहाराला सर्व आवश्यक नियामक आणि भागधारकांची मंजुरी मिळाली आहे.

### बजाज फिनसर्व्ह 'धुनिव्हर्स'चा ग्रँड फिनाले ३१ मार्चला

**मुंबई :** बजाज फिनसर्व्हच्या 'बजाज धुनिव्हर्स' या डिजिटल–फर्स्ट संगीत टॅलेंट प्लॅटफॉर्मचा भव्य ग्रँड फिनाले ३१ मार्च रोजी मुंबईत होणार आहे. या सोहळ्यात सुप्रसिद्ध संगीतकार त्रिकूट शंकर–एहसान–लॉय यांच्या उपस्थितीत 'व्हॉइस ऑफ द नेशन'ची घोषणा केली जाणार आहे. देशातील सर्वात मोठ्या डिजिटल–फर्स्ट संगीत टॅलेंट हंट उपक्रमांपैकी एक असलेल्या या स्पर्धेद्वारे देशभरातील प्रतिभावान गायकांना व्यासपीठ मिळाले. अंतिम विजेत्याला 'व्हॉइस ऑफ द नेशन' आणि 'व्हॉइस ऑफ बजाज' हा किताब मिळणार असून, त्याला शंकर–एहसान–लॉय यांच्यासोबत बजाजची 'सॉनिक आयडेंटिटी' तयार करण्याची संधी मिळेल.

### जेमिमा रॉड्रिजच्या नेतृत्वाखाली पहिली सुपर मारिओ मुंबई परेड

**पुणे :** युनिव्हर्सल पिक्चर्स इंडियाने (वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीद्वारे वितरित) मारिओ मुंबई परेडच्या माध्यमातून मुंबईच्या रस्त्यांवर मारिओचे जग जिवंत केले. हा सोहळा या वर्षातील सर्वाधिक अपेक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या द सुपर मारिओ गॅलेक्सी मुव्हीसाठी होता, जो ३ एप्रिल, २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. या अनोख्या सोहळ्यात, संपूर्ण शहर मारिओच्या रंगांनी न्हाऊन निघाले होते. १०० हून अधिक चाहते लाल रंगाचे मारिओ–थीम अस–लेले टी–शर्ट घालून रस्त्यावर उतरले. ही परेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पासून आझाद मैदानापर्यंत पसरली होती, ज्यामुळे मुंबई सुपर मारिओच्या जगात रूपांतरित झाली होती. रंग, उत्साह आणि 'चला पुढे जाऊया' असे क्षण सर्वत्र जाणवत होते.

### विवोने सादर केले वाई २१ ५जी आणि वाई११ ५जी

**मुंबई –** विवो इंडियाने आज विवो वाई२१ ५जी आणि विवो वाई११ ५जीलाँच करण्याची घोषणा केली, ज्यामुळे त्यांच्या वाई सीर–ीज पोर्टफोलिओला आणखी बळकटी मिळाली आहे. हे स्मार्टफोन्स दिवसभर दीर्घकाळ टिकणारी पॉवर आणि विश्वसनीय टिकाऊपणा देऊन टिकाऊपणाचे वचन देतात. दिवसभर आपल्या डिव्हाइसवर अवलंबून असणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन डिझाइन केलेले, हे दोन्ही स्मार्टफोन्स आकर्षक डिझाइन आणि सुरळीत वापरकर्ता अनुभवासह दिवसभर विश्वसनीय परफॉर्मन्स देत आहे.

# युद्धझळांमध्ये मोठा दिलासा!

## भारताच्या आणखी २ LPG टँकर्सना होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याची इराणकडून परवानगी

तेहरान : अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणाव कायम असताना आज (दि. २८ मार्च) भारतासाठी मोठा दिल–ासा देणारे वृत्त समोर आले आहे. इराणने संघर्षाच्या काळात भारत आणि इतर चार मित्र राष्ट्रांना या जलमार्गातून आपली जहा–जे नेण्याची परवानगी दिली जाईल, असे सांगितल्यानंतर भारताकडे जाणारे आणखी दोन एलपीजी टँकर्स संवेदनशील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून गेले. शिपिंग डेटानुसार, बीडब्ल्यू ईएलएम आणि बीडब्ल्यू टीवायआर टँकर्सनी युद्धाच्या सुरुवातीपासून प्रभावीपणे बंद असलेल्या या उच्च–जोखमीच्या कॉरिडॉरमधून प्रवास केला. ओमानच्या आखाताच्या दिशेने जात होते.

'इंडिया टूडे'ने दिलेल्या वृत्तानुसार, ९०,००० टनांहून अधिक एलपीजी (स्वयंपाकाचा गॅस) घेऊन जाणारे हे दोन भारतीय ध्वज असलेले टँकर्स आखातातून बाहेर पडताना एकमेकांच्या जवळून गेले आणि त्यांनी सुमारे २७ किमी/तास वेग कायम ठेवला. प्रामुख्याने कच्चे तेल घेऊन जाणारे आणखी सुमारे पाच भारतीय टँकर्स अजूनही संयुक्त अरब अमिरातीजवळील पाण्यात नांगरून आहेत आणि या सामुद्रधुनीतून जाण्यासाठी परवानगीची वाट पाहत आहेत. एकूण २० भारतीय ध्वज अस–लेली जहाजे आखातात अडकली आहेत. याशिवाय, या प्रदेशात अडकलेल्या आपल्या रिकाम्या जहाजांमध्ये भारत एलपीजी भरत आहे, असे रॉयटर्सने वृत्त दिले आहे. जगा–तील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतुकीच्या अडथळ्यांपैकी एक असलेल्या होर्मुझबाबत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी तेहरानची भूमिका स्पष्ट केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घडामोड समोर आली आहे. अराघची यांनी सरकारी टीव्हीला सांगितले की, चीन, रशिया, भारत, इराक आणि पाकिस्तान या पाच 'मित्र राष्ट्रांच्या' टँकर्सना सुरक्षित मार्ग दिला जाईल. त्याच वेळी, त्यांनी असा इशाराही दिला की इराणच्या शत्रूंशी संबंधित जहाजांना नाकेबंदीचा सामना करावा लागेल. एक महिन्यापूर्वी युद्ध सुरू झाल्यापासून, जग वसंत, पाइन गॅस, शिवालिक आणि नंदा देवी या किमान चार भारतीय ध्वज असलेल्या जहाजांनी या सामुद्रधुनीतून प्रवास केला आहे. जहाजाच्या मार्गाच्या माहितीवरून असे दिसून आले की, ९०,००० टनांहून अधिक एलपीजी घेऊन जाणाऱ्या 'जग वसंत' आणि 'पाइन गॅस' या जहाजांनी अरबी समुद्रातून जाणारा लहान मार्ग घेण्याऐवजी एक असामान्य मार्ग निवडला आणि इराणच्या लारक व केशम बेटांमधून होर्मुझ महासागर ओलांडला.

### ओला इलेक्ट्रिक ने एंड आईसीई एजमोहीम सुरू केली

बंगळुरू ओला इलेक्ट्रिक ने आज आपली एंड आईसीई एज मोहीम सुरू केल्याची घोषणा केली. ही मोहीम म्हणजे श्रेणीतील सर्वोत्तम उत्पादने, अत्यंत किफायतशीर किंमती आणि मालकीचा खात्रीशीर अनुभव या घटकांचा मेळ घालून, भारताचा इलेक्ट्रिक गतिशीलतेकडे होणारा प्रवास वेगवान करण्यासाठी उचललेले एक निर्णायक पाऊल आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून, कंपनी आ–पली 'जनरल ३ एस १ एक्स (२किलोवाट)' आणि 'रोडस्टर एक्स (२.५ किलोवाट )' ही मॉडेल्स केवळ ४९,९९९ मध्ये उपलब्ध करून देत आहे. यासोबतच, संपूर्ण उत्पादनांच्या श्रेणीवर ५०,००० पर्यंतचे फायदेही दिले जात आहेत – ही ऑफर केवळ ३१ मार्च २०२६ पर्यंतच वैध आहे. या उपक्रमाद्वारे, ओला इलेक्ट्रिक वाहनांना भारतीय ग्राहकांसाठी सर्वात आकर्षक पर्याय बनवत आहे; विशेषतः अशा वेळी, जेव्हा इंधनाच्या किंमतींमध्ये सातत्याने आणि संरचनात्मक वाढ होत आहे.

### नेपाळमध्ये सत्तांतरानंतर नवा संदेश;बालेन शाह–मोदी संवादातून संबंध दृढ होण्याचे संकेत

**काठमांडू :** नेपाळच्या राजकारणात मोठ्या उलथापालथीनंतर नव्या नेतृत्वाचा उदय झाला आहे. बालेन शाह यांनी पंतप्रधानपदाची धुरा सांभाळल्यानंतर भारत–नेप–ाळ संबंधांबाबत सकारात्मक संकेत दिले आहेत. त्यांच्या शपथविधीनंतर लगेचच भार–ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा देत द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याची अपेक्षा व्यक्त केली.मोदींचे अभिनंदन, शाह यांचा प्रतिसादपंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावरून शाह यांचे अभिनंदन करत भारत–नेपाळमधील ऐतिहासिक मैत्री अधिक दृढ होईल, असा विश्र्वास व्यक्त केला. त्याला उत्तर देताना शाह यांनी ही सकारात्मक भूमिका घेत, दोन्ही देशांच्या विकासासाठी एकत्र काम करण्याची तयारी दर्शवली आहे, एक्स वर पोस्ट करत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या यामुळे दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध पून्हा एकदा दृढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, सत्तेत आल्यानंतर बालेन शाह यांनी कठोर निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली आणि माजी गृहमंत्र्यांवर कारवाई केल्याची चर्चा रंगली असून, प्रशासनात मोठे बदल घडण्याची चिन्हे आहेत.






# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भरधाव ट्रकच्या धडकेत पादचारी महिलेचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ मार्च -**

कळंब शहरात भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या ट्रकच्या धडकेत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मयत शमीम जमीरोद्दीन शेख (वय ५५, रा. अरबगल्ली, सावरकर चौक, धाराशिव) या दि. २५ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.४५ वाजता होळकर चौक, कळंब येथे पायी जात असताना अपघात झाला.

यावेळी टाटा कंपनीच्या नव्या चेसिस ट्रक (क्र. यूपी ३२ एटीसी २५१३) चालकाने वाहन हायगयी व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या पाठीमागून धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या असून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी जमीरोद्दीन जैनुलाबद्दीन शेख (वय ६१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.




## संक्षिप्त वृत्त...




### जपानस्थित अभियंत्याकडून गावच्या शाळेला २१ हजारांची देणगी

**लोहारा, दि.२७ मार्च -**

लोहारा तालुक्यातील कनेगाव येथील सुपुत्र जयजित दगडू लोभे, सध्या जपान येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी २१ हजार रुपयांची देणगी दिली आहे. या मदतीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी-सुविधांमध्ये मोलाची भर पडणार असून शाळेच्या भौतिक सुविधांचा विकास होण्यास हातभार लागणार आहे. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी साळुंके यांच्या हस्ते जयजित लोभे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब कदम, सदस्य प्रद्युम्न पाटील, ग्रामपंचायत सदस्य बालाजी लोभे, महादेव लोभे, गणेश कदम, कुंडलिक कदम, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



### इटकळ येथे श्रीराम नवमी साजरी

**इटकळ, दि.२७ मार्च -**

इटकळ येथे यंदाची श्रीराम नवमी मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. दि.२५ मार्च रोजी रात्री श्रीराम मंदिरात अखंड भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दि.२६ मार्च रोजी दुपारी श्रीराम जन्मोत्सव साजरा करत पाळणा गीत सादर करण्यात आले. त्यानंतर महाआरती करून रामभक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर 'जय श्रीराम'च्या जयघोषाने दुमदुमला असून उत्सव संस्मरणीय ठरला.



### धाराशिवच्या मारुती बनसोडे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार

**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीतील महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराचे वितरण २६ मार्च रोजी मुंबई येथे झाले. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील मारुती बनसोडे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल व रोख १५ हजार रुपये देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### इंदुबाई शेटे यांचे निधन

**धाराशिव, दि.२७ मार्च -**



धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) येथील इंदुबाई हणमंत शेटे (वय ७५) यांचे गुरुवार दि.२६ मार्च रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांचे उपळा (मा.) येथे दि.२६ मार्च रोजी रात्री उशीरा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीची वज्रमुठ कायम

**तुळजापूर, कळंब आणि परंडा तालुक्यास सभापती... चार सभापतींची निवड ४५ विरुद्ध १० मतांनी निश्चित...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडीनंतर आज झालेल्या विशेष सभेत विविध विषय समित्यांच्या चार सभापतींची निवड करण्यात आली. महायुतीतील घटक पक्षांमध्ये संतुलन राखत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांना प्रतिनिधित्व देण्यात आले. सभेत झालेल्या मतदानात महायुतीच्या उमेदवारांनी ४५ विरुद्ध १० मतांनी विजय मिळवला.

कळंब तालुक्यातील डिकसळ जिल्हा परिषद गटाच्या शिवसेना (शिंदे गट)च्या पूजा तुषार शिंदे यांची महिला व बालविकास सभापतीपदी निवड झाली. त्याचप्रमाणे कळंब तालुक्यातील खामसवाडी गटाचे भाजपाचे विश्वास कोकणे यांची समाजकल्याण सभापतीपदी वर्णी लागली. परांडा तालुक्यातील डोंजा जिल्हा परिषद गटाचे सदस्य राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे भाऊसाहेब खरसाडे यांची कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी निवड करण्यात आली. तर तुळजापूर तालुक्यातील नंदगाव गटाचे भाजपाचे सिद्धेश्वर कोरे यांची अर्थ व बांधकाम सभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली.

यापूर्वी जिल्हा परिषद अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील तर उपाध्यक्षपदी उषाताई गायकवाड यांची निवड झाली होती. त्यामुळे जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेची प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे.





**महेंद्र धुरगुडे व धनंजय सावंतांची संधी हुकली...**

### निवडीनंतर सत्कार व शुभेच्छांचा वर्षाव...

निवडीनंतर जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड यांच्यासह मा.आ. राहुल मोटे व मा.आ. ज्ञानराज चौगुले, युवा नेते मल्हार पाटील, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अजित पिंगळे यांनी निवड झालेल्या सर्व सभापतींचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित पदाधिकारी व प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्त्यांनीही नव्याने निवड झालेल्या सभापतींवर अभिनंदनाचा वर्षाव केला.



श्री. सिद्धेश्वर बळीराम कोरे — अर्थ व बांधकाम सभापती
सौ. पूजाताई तुषार शिंदे — महिला व बालकल्याण सभापती
श्री. भाऊसाहेब बाळासाहेब खडसरे — कृषी व पशुसंवर्धन सभापती
श्री. विश्वास हनुमंत कोकणे — समाज कल्याण सभापती

### विकासाला गती देण्याचा निर्धार : अर्चनाताई पाटील



निवडीनंतर माध्यमांशी बोलताना जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी सांगितले की, महायुतीमध्ये पूर्ण एकवाक्यता असून मार्गदर्शक नेतृत्वाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद विकासाला गती देण्यात येणार आहे. महायुतीमध्ये कोणातही मतभेद नसून पुढच्या कार्यकाळात इतर सदस्यांनाही संधी दिली जाईल. तसेच नवनियुक्त सभापती व सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन पारदर्शक व प्रभावी कारभार केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपासून सभापती पदांसाठी महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरू होती. विविध इच्छुकांकडून प्रयत्न सुरू असतानाच आजच्या विशेष सभेत सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला.




दवाटप करताना महायुतीतील सर्व घटक पक्षांना योग्य प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आले. महाविकास आघाडीकडूनही सभापती पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. मात्र मतदान प्रक्रियेत त्यांना यश मिळू शकले नाही.

महायुतीच्या उमेदवारांनी स्पष्ट बहुमताच्या जोरावर सर्व चारही पदांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. या पदवाटपानंतर जिल्हा परिषदेतील सत्तासमीकरण स्पष्ट झाले असून, आगामी काळात विविध विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पत्नीच्या खूनप्रकरणी पतीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**



पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा खून केल्याप्रकरणी पती वाहिद बिलाल कुरेशी यास न्यायालयाने जन्मठेपेची व ३० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांनी हा निकाल दिला.

सरकारी वकील अ‍ॅड. महेंद्र देशमुख यांनी मांडलेला युक्तिवाद व सादर पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. या प्रकरणात बाल साक्षीदाराची साक्ष महत्त्वाची ठरली.

नळदुर्ग येथे ५ नोव्हेंबर २०२४ रोजी आरोपीने पत्नी सुलताना हिच्यावर चाकू व कात्रीने वार करून तिचा खून केला होता. घटनेनंतर आरोपीने स्वतःवरही वार करून जखमी झाला होता.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

## वाशी येथे अवैध मद्य जप्त; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ मार्च -**

ईट परिसरात अवैध मद्य विक्रीच्या उद्देशाने साठा बाळगणाऱ्या गणेश नवनाथ चांगन (वय २६, रा. वाशी) याच्याकडून पोलिसांनी कारवाई करत सुमारे ८०० रुपयांच्या २० सिलबंद देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या.

ही कारवाई २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी हॉटेल शिंवाश परिसरात करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ मार्च -**



परंडा पोलीस ठाणे हद्दीत एका १७ वर्षे ८ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. पीडितेचे नाव व गाव गोपनीय ठेवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मे २०२५ ते दि.२१ जून २०२५ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास एका गावातील तरुणाने माझी आई आजारी आहे असे सांगून पीडितेला घरकामासाठी आपल्या सोबत नेले. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पीडितेच्या आजोबांनी दि.२६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात पोक्सो कायद्यान्वये कलम ४, ६, ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वीज वाहिन्यांच्या तारा चोरी; दीड लाखांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ मार्च -**

भुम पोलीस ठाणे हद्दीत वीज वाहिन्यांच्या तारा चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१० मार्च रोजी दुपारी १२.३० वाजण्यापूर्वी ते दि.२५ मार्च दरम्यान उमाचीवाडी व दुधोडी शिवारात ही चोरी घडली. उमाचीवाडी व दुधोडी शिवारातील २९ स्पॅनमधील तसेच दुधोडी शिवारातील १८ स्पॅनमधील वीज वाहिन्यांच्या कंडक्टर (तारा) असा एकूण सुमारे १,५०,००० रुपयांचा माल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादी अमोल मोटे यांनी दि.२६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## उमरग्यात ११९ महिला बचत गटांना ५.३२ कोटींचे कर्ज; महिला सशक्तीकरणाला चालना



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

महिला सशक्तीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती उमरगा यांच्या वतीने भव्य कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. बुधवार (दि. २५) रोजी पंचायत समिती सभागृह, उमरगा येथे पार पडलेल्या या मेळाव्यात तालुक्यातील ११९ स्वयं सहायता समूहांना तब्बल ५ कोटी ३२ लाख रुपयांचे कर्ज मंजुरीपत्र वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पंचायत समितीच्या नूतन सभापती अ‍ॅड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांनी भूषविले. उपसभापती रेखा इंगळे, गटविकास अधिकारी प्रशांतसिंह मरोड यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध बँकांचे शाखा व्यवस्थापक, पंचायत समितीचे अधिकारी व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. या मेळाव्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र आणि बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कर्ज वितरण करण्यात आले.

समूह कर्जासोबतच १४ महिला सदस्यांना वैयक्तिक उद्योगासाठी २० लाख ४० हजार रुपयांचे कर्ज मंजूर करून वाटप करण्यात आले.

दरम्यान, एसबीआयचे शाखा व्यवस्थापक डॉ. अंकुश यांनी महिलांनी नवीन उत्पन्नाचे स्रोत निर्माण करून शासन व बँक योजनांचा लाभ घ्यावा तसेच आर्थिक व्यवहार पारदर्शक ठेवावेत, असे आवाहन केले. या कर्ज मेळाव्यात एकूण ११९ गटांना ५.३२ कोटी रुपये तसेच वैयक्तिक उद्योगासाठी १४ महिलांना २०.४० लाख रुपये वितरित करण्यात आले.

या उपक्रमामुळे तालुक्यातील महिलांना आर्थिक बळ मिळून त्यांचे सशक्तीकरण अधिक मजबूत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### महिलांनी स्वावलंबी व्हावे : आकांक्षा चौगुले

उमरगा पं.स. सभापती अ‍ॅड. आकांक्षा चौगुले यांनी मार्गदर्शन करताना महिलांना कर्जाच्या माध्यमातून विविध व्यवसाय उभारून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. तसेच समूहाच्या माध्यमातून उत्पादन तयार करून विक्री केंद्रे उभारावीत व प्रशिक्षणाच्या साहाय्याने व्यवसाय वाढवावा, असे त्यांनी सांगितले.

## पंढरपूर-शेगाव रेल्वेमार्गाला मंजुरी द्या : लोकसभेत ओमराजे निंबाळकर यांची मागणी

**धाराशिव जिल्ह्यातील परंडा, भूम तालुक्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल मार्ग...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**



धाराशिव लोकसभेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत जनतेच्या जिव्हाळ्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करत पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग तातडीने मंजूर करण्याची जोरदार मागणी केली. सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार निंबाळकर यांनी सांगितले की पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि शेगाव गजानन महाराज मंदिर ही महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रे असून दरवर्षी कोट्यवधी भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र, या दोन तीर्थक्षेत्रांना थेट रेल्वेने जोडणारा मार्ग नसल्यामुळे भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित होणार असून मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र हे भाग थेट रेल्वेमार्गाने जोडले जातील. याचा मोठा फायदा सामान्य नागरिक आणि भाविकांना होईल, असे त्यांनी नमूद केले.

या रेल्वेमार्गाचे महत्त्व केवळ धार्मिक पर्यटनापुरते मर्यादित नसून सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे खासदार निंबाळकर यांनी ठामपणे सांगितले.

या मार्गामुळे व्यापार व उद्योगांना चालना शेतीमाल वाहतुकीस गती रोजगाराच्या संधी वाढ होणार असून अशी अनेक सकारात्मक परिणाम घडतील, असे त्यांनी स्पष्ट केले. धाराशिव जिल्ह्यातील भूम व परंडा तालुक्यातील नागरिकांनी या रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून सातत्याने लढा दिला आहे. 'रेल्वे संघर्ष समिती' तसेच विविध शेतकरी संघटनांनी आंदोलने, निवेदने व पाठपुरावा करून ही मागणी जिवंत ठेवली आहे.

या संदर्भात अनेक प्रतिनिधींनी भेटीगाठी व निवेदनांद्वारे हा प्रश्न माझ्याकडे मांडला होता, अशी माहितीही खासदार निंबाळकर यांनी दिली.




### केंद्र सरकारकडे ठाम मागणी...

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणासाठी तातडीने निधी द्यावा सर्वेक्षण प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी. प्रकल्पास मंजुरी द्यावी अशी आक्रमक मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली. या मागणीमुळे सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा जिल्ह्यांतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर वाचा फुटली असून, आता केंद्र सरकार कोणते ठोस निर्णय घेते याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## बनावट सोन्याच्या आमिषाने वृद्ध महिलेची ९० हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ मार्च -**




तुळजापूर शहरात बनावट सोन्याचे आमिष दाखवून एका वृद्ध महिलेची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे.

फिर्यादी पार्वती कृष्णकुमार राठोड (वय ६०, रा. गोकुळ नगर, रोहिणी नगर ३, सैफुल, सोलापूर) या दि. २६ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता तुळजापूर येथील जुने बसस्थानक परिसरात जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले.

या इसमांनी १० तोळ्याचे दोन सोन्याचे बिस्कीट सापडले आहेत असा बनाव करून त्यातील एक खोटे सोन्याचे बिस्कीट राठोड यांना दिले. त्याबदल्यात त्यांच्या विश्वासास पात्र ठरवत त्यांच्या गळ्यातील सुमारे २ तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण (अंदाजे किंमत ९०,००० रुपये) घेऊन आरोपी पसार झाले.

या प्रकरणी पार्वती राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी नवे संधीचे दालन कार्यशाळेत - कुलगुरू मणि

## वनामकृवित कार्बन क्रेडिट व कार्बन शेती कार्यशाळा, आमदार डॉ. राहुल पाटील यांचे मार्गदर्शन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ () येथे कार्बन क्रेडिट, कार्बन शेती व कार्बन ट्रेडिंग या विषयावर दिनांक २६ मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून परभणी विधानसभा सदस्य तथा विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य माननीय आमदार डॉ. राहुल पाटील, ग्रो इंडिया कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उषा बारवाले झेहर आणि संचालक श्री अविनाश सोनी हे होते.

यावेळी संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, कार्बन क्रेडिटचे नोडल अधिकारी तथा संशोधन उपसंचालक डॉ. हरिहर कौसडीकर प्रत्यक्ष उपस्थित होते तर ऑनलाईन माध्यमातून भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतील मुख्य शास्त्रज्ञ डॉ. विनय सहगल, डॉ. आरती भाटिया, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतील एकात्मिक शेती पद्धती विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद झा, आदी मान्यवरांची उपस्थिती होती

कार्यशाळेत बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी विद्यापीठाचा शतकीय वारसा अधोरेखित करत १९१८ पासून संशोधन केंद्र म्हणून सुरू झालेल्या संस्थेने १९७२ मध्ये विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून महाराष्ट्रातील विविध हवामान परिस्थितींना अनुरूप संशोधन कार्य केले असल्याचे सांगितले. सध्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदे () कडून '' दर्जा प्राप्त करत राज्यातील चार कृषि विद्यापीठांमध्ये विद्यापीठ अग्रस्थानी असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या साडेतीन वर्षांत हवामान बदल, मृदा आरोग्य व प्रिसिजन शेती या क्षेत्रात सुमारे १५० कोटी रुपयांचे संशोधन प्रकल्प विद्यापीठाने प्राप्त केले आहेत. महाराष्ट्र हे हवामान बदलाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे संवेदनशील राज्य असून मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी कार्बन क्रेडिट ही जोखीम व्यवस्थापनाची प्रभावी संधी ठरू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः २०२४ मधील अतिवृष्टीमुळे गोदावरी तूरसारख्या व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले होते, याचा संदर्भ देत त्यांनी शाश्वत शेती पद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले. चांगले परिणाम मिळवण्यासाठी 'गुड केमिस्ट्री' (सहकार्य व समन्वय) आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

विधानसभा सदस्य तथा विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य माननीय आमदार डॉ. राहुल पाटील यांनी कार्बन क्रेडिट व कार्बन शेती या भविष्याभिमुख विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सद्यस्थितीचा आढावा घेत संबंधित उपक्रमांच्या प्रगतीची माहिती जाणून घेत शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी आवश्यक त्या प्रभावी सूचना दिल्या. तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासोबतच पर्यावरण संरक्षण साध्य करण्यासाठी कार्बन शेतीचा व्यापक प्रसार करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. मराठवाड्यात कार्बन क्रेडिट चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी सर्व संस्था व शास्त्रज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदवावा आणि विद्यापीठातील विविध विभागांतील तज्ज्ञांच्या ज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असे त्यांनी सुचविले.

डॉ. विनय सहगल यांनी मराठवाडा विभागात काम केल्याचा अनुभव सांगत, येथील कार्बन क्रेडिटसाठी पीक पद्धतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. डॉ. आरती भाटिया यांनी कार्बन क्रेडिट संदर्भातील विविध मॉडेलची माहिती देताना, विशेषतः काटेकोर व शाश्वत शेती पद्धतींबाबत सविस्तर उहापोह केला तर डॉ. प्रमोद झा यांनी कार्बन शेतीतील आव्हानांवर प्रकाश टाकताना, भारतात कार्बन क्रेडिट नोंदणीसाठी सक्षम संस्था कार्यरत नसल्याचे नमूद केले. तसेच परदेशी संस्थांकडून नोंदणी करताना मोठ्या प्रमाणात शुल्क भरावे लागते, असे त्यांनी सांगितले.

ग्रो इंडिया कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उषा



बारवाले झेहर तसेच ग्रो इंडिगोच्या तज्ज्ञांनी ग्रो इंडिया संस्थेबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांच्या माध्यमातून पंजाब राज्यात कार्बन क्रेडिट मिळविण्यात यश आले असून अशाच प्रकारचे प्रकल्प देशातील पाच राज्यांत सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्यातही या पद्धतीचे प्रकल्प राबविण्यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. शेती पद्धतींमध्ये आवश्यक बदल करून हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी केल्यास त्या घटेचे रूपांतर कार्बन क्रेडिटमध्ये केले जाते. एक टन समतुल्य उत्सर्जन घट म्हणजे एक कार्बन क्रेडिट मानले जाते. ही क्रेडिट्स आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त संस्थांकडे नोंदवून मोठ्या कंपन्यांना विक्रीसाठी उपलब्ध केली जातात. सध्या ग्रो इंडिगोने सुमारे १० लाख एकर क्षेत्र आणि २ लाख शेतकऱ्यांचा या उपक्रमात समावेश केला आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेत विद्यापीठ व ग्रो इंडिगो यांच्यात सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी कार्बन शेती विषयक संशोधन प्रकल्प सुरू करणे, सामंजस्य करार () करणे, तसेच अभ्यास मंडळ व सल्लागार समित्यांमध्ये तज्ज्ञांचा समावेश करणे यावर चर्चा झाली. कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सचिन मोरे यांच्याकडे डेटा संकलन व विश्लेषणाची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच 'बायोमिक्स' सारख्या जैविक इनपुट्सचा वापर वाढवून शाश्वत शेतीला चालना देण्याचेही आवाहन करण्यात आले.

कार्यशाळेचा समारोप करताना मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये कार्बन शेतीचा मोठ्या प्रमाणावर पायलट प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आर्थिक व तांत्रिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यशाळेत सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. प्रविण वैद्य, विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, डॉ. सचिन मोरे आदी मान्यवरांसह विद्यापीठातील शास्त्रज्ञांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. हरिहर कौसडीकर यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...

### विसावा कॉर्नरवरील पुलाच्या बांधकामानिमित्त रविवारी जिंतूर रस्त्यावरील वाहतूक बाह्य वळण रस्त्याच्या मार्गाने : जिल्हा पोलिस अधिक्षकांची माहिती

**परभणी,दि.२७(प्रतिनिधी) :** परभणी ते जिंतूर या महामार्गावर विसावा नाक्याजवळील कालव्यावरील नवीन पुलाच्या कामाच्या निमित्ताने रविवार २९ मार्च रोजी सकाळी ६ ते दुपारी १ वाजेपर्यंत जिंतूर रस्त्यावरील ये-जा करणारी वाहने पाथरी रस्त्यावरील बाह्य वळण रस्त्याच्या मार्गे वळविण्यात आली आहेत.

जिंतूर रस्त्यावरील विसावा कॉर्नर लगतच्या कालव्यावरील पुलाचे काम सुरु झाले आहे. एमएसआरडीसी लि. छत्रपती संभाजीनगर व पीएसके रिथविक जे.व्ही. या कंपनी मार्फत या पुलाचे काम होणार आहे. त्या निमित्ताने या महामार्गावरील दररोज होणारी हलकी व अवजड वाहतूक रविवारी सकाळी ६ वाजल्यापासून पाथरी रस्त्यावरील नवीन बाह्य वळण रस्त्याच्या मार्गे जिंतूरकडे वळविण्यात आली आहे. तर जिंतूरहुन येणारी वाहने त्याच मार्गे परभणीकडे वळविण्यात आली आहेत.

वाहनधारकांनी या पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी केले आहे.

### सासरवाडीत मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीमुळे जावयाची आत्महत्या : दैठणा पोलिस ठाण्यात चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,दि.२७(प्रतिनिधी) :** सासरवाडी मिळालेल्या अवमानास्पद वागणूकीमुळे जावयाने आत्महत्या केल्याची घटना दैठणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. दरम्यान, या प्रकरणात चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसमत तालुक्यातील हट्टा येथील संदीप डुकरे (वय २५ वर्ष) हे स्वतःच्या पत्नी व मुलीस सावरवाडीहून परत आणण्याकरीता परभणी तालुक्यातील सिंगणापूर या गावी म्हणजे सासरवाडीस दाखल झाले. त्यावेळी सासरच्या मंडळींनी मुलीस परत पाठविण्यास नकार तर दिलाच व धमक्याही दिल्या. त्याच ताण तणावातून डुकरे यांनी शुक्रवारी पहाटे सिंगणापूर येथील रेल्वे गेट परिसरात रेल्वे समोर उडी मारुन आत्महत्या केल्याची माहिती डुकरे कुटूंबियांनी दैठणा पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीद्वारे दिली. त्या आधारे पोलिसांनी चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस या प्रकरणात तपास करीत आहेत.

### पाथरी नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्तारुढ विरुध्द विरोधकात जोरदार खडाजंगी : तणावपूर्ण वातावरणात नगराध्यक्षांनी गुंडाळली बैठक

**पाथरी,दि.२७(प्रतिनिधी) :** पाथरी नगरपालिकेंतर्गत पहिल्या सर्वसाधारण सभेत शुक्रवार २७ मार्च रोजी सत्तारुढ आणि विरोधी पक्षात जोरदार खडाजंगी झाली. त्यात प्रत्येक ठरावावर मतदान घ्यावे, अशी मागणी विरोधकांनी केली खरी परंतु, नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी ती मागणी फेटाळून बैठक गुंडाळली.

पालिका सभागृहात सकाळी ११ वाजता या बैठकीस प्रारंभ झाला. यावेळी नगराध्यक्ष आसेफ खान यांच्यासह कार्यालयनी अधिक्षक अशोक वाघुम्बरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते यावेळी नगराध्यक्ष आसेफ खान यांनी एका पाठोपाठ एक विषय सभागृहासमोर सादर केले. त्यावेळी पालिकेंतर्गत स्विकृत सदस्य तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी अनेक आक्षेप नोंदविले. विशेषतः अर्थसंकल्पीय बैठकी संदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी नगराध्यक्ष आसेफ खान यांनी १६ मार्च रोजीच्या अर्थसंकल्पीय बैठकीस विरोधी सदस्य अनुपस्थित होते, त्यामुळे ते विषय आता पुन्हा घेता येणार नाहीत, असे नमूद केले. त्यावेळी अन्य विषय मांडले तेव्हा दुर्राणी यांनी प्रत्येक विषयात आक्षेप नोंदवून मतदान घ्यावे, अशी मागणी केली. परंतु, नगराध्यक्ष आसेफ खान यांनी मतदानाच्या मागणीस नकार दिला व ठराव मंजूर झाल्याचे नमूद करीत बैठकच गुंडाळली.

दरम्यान, सभागृहाबाहेर नगराध्यक्ष आसेफ खान यांनी सर्व ठराव बहुमताने मंजूर झाल्याची माहिती दिली. तर दुर्राणी यांनी सभागृहात सत्ताधारी पक्षाकडे बहुमतच नव्हते, असा दावा करीत चुकीच्या पध्दतीने नगराध्यक्षांनी बैठक हाताळल्याचा आरोप केला.

### निवडणूक कर्तव्यात कसूर करणाऱ्या बीएलओ विरुध्द तहसील कार्यालयाच्या तक्रारी आधारे गुन्हा दाखल

**परभणी,दि.२७(प्रतिनिधी) :** निवडणूक कर्तव्यात कसूर करणाऱ्या एका बिएलओ विरुध्द तहसील कार्यालयाने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करीत गुन्हा दाखल केला.

परभणी विधानसभा मतदारसंघात सध्या मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम युध्द पातळीवर सुरु आहे. सन २००२ च्या मतदार यादीतील नावांचे सन २०२४ च्या यादीशी मॅपींग करण्याचे महत्वाचे काम सुरु असतांना येथील मतदान केंद्र क्रमांक ९६/२२२ वर बिलएलओ म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या डॉ. एपीजे अब्दुल कलाम शाळा येथील शिक्षक सय्यद फरहान सय्यद रहीम यांनी १३ मार्च रोजी गैरहजेरी नोंदवली. त्यानंतर त्यांनी मतदार पुनर्निरीक्षणचे कोणतेही काम केले नाही. निवडणूक विभागातर्फे त्यांच्याशी वारंवार मोबाईलवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, आपला मोबाईल बंद ठेवला. या पार्श्वभूमीवर मॅपिंगच्या महत्वाच्या कामांपासून मतदारांना वंचित ठेवणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने उल्लंघन करणे, कामात हलगर्जीपणा करणे या कारणास्तव नायब तहसीलदार सुनील जयराम कांबळे यांनी संबंधित शिक्षका विरुध्द लोकप्रतिनिधी अधिनियम १९३४ अन्वये पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या आधारे पोलिसांनी संबंधित बीएलओ विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, निवडणूक कामात हलगर्जी करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही, असे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. संदीप राजापूरे यांनी म्हटले आहे.

### मारुती मंदिरातील मूर्ती प्रकरणावरून भाजप नगरसेवकांचे मनपाला निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**परभणी,दि.२७(प्रतिनिधी) :** शहरातील मारुती मंदिरातील मूर्ती व पंचरंगी ध्वज हटविण्यात आल्याच्या घटनेवरून संताप व्यक्त करत भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांकडून महानगरपालिकेला निवेदन देण्यात आले आहे. या घटनेमुळे हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. भाजपाचे नगरसेवक गणेश उर्फ बबलू टाक, रितेश झांबड, विश्वजित बुधवंत, डॉ. केदार खटींग, सौ. मीनाताई वरपुडकर, निर्मला वाघमारे, गिरीजा आजेगांवकर, वैशाली दैठणकर, सुशिला थोरात, सपना जुकटे, अद्वैत पार्डीकर आदींच्या वतीने देण्यात आला आहे.

### श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्यावतीने प्रवाशांच्या सेवेत थंडगार जार पाणपोई.

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** वेदांत केसरी श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान सोनपेठ यांच्या वतीने याही वर्षी रामनवमी च्या शुभमुहूर्तावर बस स्थानक परिसरात मोफत जार पाणपोई सुरू करण्यात आली आहे. पाणपोई चे उदघाटन ज्येष्ठ नागरिक नंदकुमार कोटलवार यांच्या हस्ते ब्र.भु. रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन संपन्न झाले. सामाजिक कार्यामध्ये नेहमी आग्रही असलेले येथील श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्या वतीने विविध धार्मिक ,सामाजिक उपक्रम राबवले जाते, दर वर्षी उन्हाळ्याची चाहूल लागताच येथील बस स्थानकमध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी थंडगार पाण्याची सोय केली जाते. यासाठी दिवसभर पुरतील तेवढे फिल्टरच्या शुद्ध पाण्याने भरलेले थंडगार जार पाणीपोई मध्ये ठेवले जातात. त्यामुळे रखरखत्या उन्हात तहानलेल्या प्रवाशांना थंडगार पाणी पिण्यासाठी मिळते. पुढे पावसाळ्यापर्यंत ही पाणीपोई सुरू असते. याप्रसंगी ब्र.भु. रंगनाथ महाराज प्रतिष्ठान चे बालाजी वांकर, वाहतूक नियंत्रक सुरेश घोणे, संपादक किरण स्वामी, प्रतिष्ठानचे प्रशांत पाम्पटवार,जितेंद्र वांकर, बालाजी पदमवार,राहुल लोहगावकर, आकाश चव्हाण, राकेश मेहता,नागनाथ शेटे प्रदीप वांकर,कांबळे,वाहक चालक, प्रवाशी उपस्थित होते.

## प्रगतशील शेतकरी संजय नाईकवाडे यांना 'ॲग्रीकल्चरल लीडरशिप अवॉर्ड' जाहीर

**सेलू,/प्रतिनिधी:** कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोग, शाश्वत शेतीचे धोरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावी प्रसार केल्याबद्दल देऊळगाव (ता. सेलू) येथील प्रगतशील शेतकरी संजय नाईकवाडे यांना तिफन () फाउंडेशनतर्फे २०२५ चा मानाचा 'ॲग्रीकल्चरल लीडरशिप अवॉर्ड' जाहीर झाला आहे. फाउंडेशनचे समन्वयक अनंत देशमुख यांनी अधिकृत पत्राद्वारे पुरस्काराची घोषणा केली असून, या यशामुळे जिल्हाभरातून नाईकवाडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संजय नाईकवाडे यांनी पारंपारिक शेतीपलीकडे जाऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. विशेषतः रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी त्यांनी उभारलेले 'चौकी सेंटर' परिसरातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांनी शाश्वत शेतीचा मार्ग स्वीकारत उत्पादनात लक्षणीय वाढ साधली आहे.

प्रेरणादायी नेतृत्वाचा गौरव :

शेतीबरोबरच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी नाईकवाडे यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता, नियोजनबद्धता आणि शेतकरीहिताचा दृष्टिकोन यामुळे कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल घडून आला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत तिफन फाउंडेशनने त्यांची निवड केली आहे.

लवकरच सन्मान सोहळा :

तिफन फाउंडेशन हे राज्यस्तरीय व्यासपीठ असून, राज्यातील विविध जिल्ह्यांतील अधिकारी व कर्मचारी यामध्ये सहभागी आहेत. या पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, पुढील काळातही कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक सुखदेव जमदडे यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळा लवकरच मान्यवरांच्या हस्ते पार पडणार असून, दिनांक व स्थळ लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.


संजय नाईकवाडे यांना मिळालेला हा सन्मान परिसरातील तरुण शेतकरी आणि कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## कुशल बिलांच्या प्रस्तावांना अनुदानाची प्रतीक्षा
## सोनपेठ पंचायत समिती अंतर्गत रोहयोचे अनुदान रखडले

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ,/प्रतिनिधी:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सार्वजनिक व वयक्तिक लाभांच्या विविध योजनांसाठी कुशल कामासाठी दिले जाणारे अनुदान रखडले असून संबंधित प्रस्ताव ऑनलाईन होत नसल्यामुळे शेतकरी व लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणी वरीष्ठ प्रशासकीय पातळीवरुन योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने खास करून ग्रामीण शेतकऱ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध प्रकारचे कामं केली जातात.या कामांसाठी शासनाकडून शंभर टक्के रक्कम अनुदानाच्या स्वरूपात दिली जाते. त्यामधून ६० टक्के रक्कम रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या रोजगारावर खर्च करण्यात येते तर उर्वरित ४० टक्के रक्कम ही कुशल कामावर खर्च केल्या जाते. कुशल कामासाठी अगोदर ग्रामपंचायत किंवा संबंधित लाभार्थ्यांनी स्वतःच्या खिशातून रक्कम खर्च करावी लागते. त्यानंतर काम पूर्ण झाल्यानंतर, विहित नमुन्यात पंचायत समितीकडे प्रस्ताव दाखल केल्यानंतर खर्च केलेली ४० टक्के रक्कम संबंधित लाभार्थ्याला शासनाकडून दिली जाते. परंतु कुशल कामाच्या ४०% रकमेचे बिल ऑनलाईन होत नसल्यामुळे सदरचे संकेतस्थळ बंद असल्याचे सांगितले जात आहे. परिणामी कुशल बिलाचे १०० पेक्षा जास्त प्रस्ताव ऑनलाइन होत नसल्याने सोनपेठ पंचायत समितीत धुळखात पडले आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहीर,शेत तळे,गाय गोठा, फळबाग लागवड आदी कामं पुर्ण झालेल्या शंभरहून अधिक रोहयो कामांचे कुशल बिलं रखडली आहेत. त्यामुळे कामांवर खर्च करुनही कुशलचे पैसे मिळत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.कुशल बिलांची रक्कम आदा करण्यासाठी असणारी वेबसाइट तात्काळ सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

अशी असते योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना () महाराष्ट्र अंतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना अकुशल रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी वैयक्तिक आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारची कामे केली जातात. या योजनेचा उद्देश ग्रामविकास आणि मजुरांना रोजगार देणे हा आहे.




वैयक्तिक लाभाची कामे (वैयक्तिक शेती सुधारणा): ही कामे प्रामुख्याने अल्पभूधारक, अनुसूचित जाती/जमाती आणि दारिद्र्य रेषेखालील () लाभार्थ्यांच्या शेतात केली जातात.

वय्यक्तीक लाभाची कामे

फळबाग लागवड: अमृत महोत्सवी फळझाड किंवा इतर वृक्ष लागवड. सिंचन विहीर: वैयक्तिक सिंचन विहिरीचे बांधकाम. शेततळे: शेतामध्ये पाणी साठ्यासाठी शेततळे खोदणे. जमीन सुधारणा: पडिक जमीन लागवडीखाली आणणे. गांडूळ खत: कंपोस्ट किंवा गांडूळ खत युनिट उभारणी. पशुसंवर्धन शेड: शेळ्या-मेंढ्या किंवा कुक्कुटपालन शेडची उभारणी.

सार्वजनिककामे (सामुदायिकविकास) ही कामे गावाच्या विकासासाठी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनासाठी केली जातात: जलसंधारण: माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव, समतल चर ( ) खोदणे. रस्ते विकास: गावात पक्के रस्ते (खडीकरण/मुरमीकरण) तयार करणे. वृक्षारोपण: रस्ते किंवा सार्वजनिक ठिकाणी वृक्ष लागवड. गावातील पायाभूत सुविधा: अंगणवाडी इमारतीचे बांधकाम, स्मशानभूमी विकास, पंचायत घर बांधकाम. स्वच्छता कामे: गावातील नाल्यांचे खोलीकरण आणि स्वच्छता.

प्रतिक्रिया

रोजगार हमी योजनेतील प्रत्येक कामाला पंचायत समितीकडून प्राधान्य दिले जाते. वैयक्तिक लाभाच्या कामासाठी मी स्वतःहून तात्काळ मंजुरी देतो व जवळपास बहुतांश कामावरील मजुरांची ६० टक्के रक्कम वितरित झालेली आहे. कुशल कामावरील खर्च झालेली रक्कमही त्वरित मिळणार आहे. त्यासाठी कुठल्याही शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. संकेतस्थळ सुरू होताच सर्वांची बिलं तात्काळ ऑनलाईन करून कुशल रक्कम ची मागणी केल्या जाणार आहे.

-मधूकर कदम, गटविकास अधिकारी सोनपेठ.

प्रतिक्रिया

रोहयो अंतर्गत सोनपेठ तालुक्यात वैयक्तिक सिंचन विहीर, फळबाग लागवड, गाय गोठा अशा प्रकारचे १०० पेक्षा जास्त कामे पूर्ण झाली आहेत. संबंधित कामावरील खर्च झालेल्या चाळीस टक्के रकमेच्या कुशल बिलांसाठीचे कांहीं प्रस्ताव आमच्याकडे प्राप्त झाले असून बिलं ऑनलाईन करण्यासाठी चे संकेतस्थळ बंद असल्यामुळे सदरील प्रस्ताव ऑनलाइन होत नाहीत. संकेतस्थळ सुरू झाल्यानंतर सर्व प्रस्ताव ऑनलाइन करण्यात येणार आहेत.

-पवन राठोड (एपीओ,रोहयो सोनपेठ)

## अग्रलेख...

# या उदासीनतेवर उपाय काय?

कोणत्याही सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी सरकारने जेवढे सजग असावे लागते, तेवढीच सतर्कता समाजानेही बाळगावयास हवी. म्हणजे, सरकार आणि समाज यांनी सामूहिकपणे समस्यांचा सामना केल्यास त्या लवकर सोडविणे शक्य होत असते, अन्यथा अनेक समस्या दीर्घकाळापासून समाजाच्या मानगुटीवर ठाण मांडून बसून राहतात. आजकाल समस्यांचा एवढा डोंगर समोर उभा ठाकला आहे की, कोणत्या समस्येस अगोदर सामोरे जावे आणि कोणती समस्या सोपी करण्यास प्राधान्य द्यावे याचाच संभ्रम सर्वत्र माजलेला दिसतो. एखादी जुनाट, दीर्घकाळापासून सतावणारी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने समाज व सरकार यांनी समंजसपणे काही पावले टाकण्यास सुरुवात करावी तोवर त्याहूनही उग्र अशी नवीच समस्या समोर उभी राहते आणि जुन्या समस्येची सोडवणूक करण्याचे प्राधान्यच मागे पडून जाते. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या दुर्गम भागांतील आदिवासी समाजाबरोबरच आता शहरी भागांतही भेडसावणारी कुपोषण आणि बालमृत्यूची समस्या सोडविण्याचे आजवरचे सारे प्रयत्न पूर्वीच यशस्वी झाले असते. या समस्येची पाळेमुळे कोठे रुजली आहेत, याची सरकारांना आणि समाजासही नेमकी जाणीव आहे. कोणत्या उपायांमुळे ती उपटून काढता येतील यावरही आजवर बराच खल झाला असून काही उपाय हाती लागलेले आहेत. पण तरीही, ही समस्या कमी न होता दिवसेंदिवस उग्र होताना दिसत असल्याने नव्या समस्यांमध्ये गुरफटत असतानाही या जुन्या समस्येचा विळखा सोडविता येत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. आता केवळ विदर्भातील मेळघाटासारख्या आदिवासी भागातच नव्हे, तर शहरी भागातही, विशेषतः मुंबईसारख्या प्रगत, अत्याधुनिक आणि विकसित महानगरातील कुपोषणासारख्या समस्येचा विळखा पडल्याचे विविध पाहणी अहवालांतून स्पष्ट झाल्याने कुपोषण-बालमृत्यूसारख्या कोवळ्या जिवांचा घास घेणाऱ्या समस्येचा सामना करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावेच लागेल, अशी अपरिहार्य स्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच या समस्येची याआधीही वारंवार दखल घेऊन त्यावर तीव्र चिंता व्यक्त करणाऱ्या न्यायालयाने आता पुन्हा या समस्येत लक्ष घातले ही बाब स्वागतार्ह ठरते.

मेळघाट आणि परिसरात कुपोषणामुळे बालकांच्या, गर्भवती महिलांच्या किंवा स्तनदा मातांच्या मृत्यूंचा मुद्दा महाराष्ट्राच्या मानगुटीवरून दूर होत नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी तीव्र चिंता व्यक्त केली. ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत न्यायालयाने गेल्या तीन दशकांत अनेक आदेश दिले, वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करण्याच्या अनेक सूचना सरकारांना दिल्या, परंतु न्यायालयाच्या आदेश आणि हस्तक्षेपानंतरही ही समस्या कायम राहिली ही प्रगत महाराष्ट्राची शोकांतिका आहे, अशी खंत व्यक्त करताना न्यायालयाने मांडलेल्या मुद्याचे गांभीर्य लक्षात घ्यावयास हवे. मेळघाटातील ही समस्या सोडविण्यासाठी अनेक सामाजिक संस्था-संघटना आणि व्यक्तींचे समूह सातत्याने प्रयत्न करीत असतात. सरकारी धोरणांची जबाबदारीपूर्वक अंमलबजावणी व्हावी यासाठी पाठपुरावा सुरू असतो. म्हणजे या समस्येबाबत समाज पुरेसा सतर्क आहे, हे स्पष्ट झाले आहे; किंबहुना गेल्या तीन दशकांपासून या समस्येकडे सातत्याने सरकारचे लक्ष वेधण्याचे काम समाजाने समंजसपणे पार पाडलेले आहे. त्यामुळेच उपाययोजनांबाबतची धोरणे आखणे सरकारला भाग पडलेले आहे. असे असतानाही त्यांची अंमलबजावणी करण्यात जर उदासीनता दिसत असेल, तर त्याबाबत समाजाने सरकारी यंत्रणेस जाब विचारावयास हवा. सरकार सजग असूनही यंत्रणा मात्र सुस्त असतील, तर सरकारी धोरणे केवळ कागदावरच राहतात आणि ती प्रभावी असूनही त्याचे परिणाम मात्र शून्यच राहतात याचे याहून अन्य वेगळे बोलके उदाहरण महाराष्ट्रासमोर नसावे. तशा अन्य अनेक समस्याही केवळ अशाच कारणांमुळे कायमच्या रेंगाळत असल्याचेही स्पष्ट झालेले आहे. शेतकऱ्यांच्या समस्या ही अशीच एक समस्या आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर समस्यांचा डोंगर उभा का राहिला, याची कारणे एव्हाना पुरेशी स्पष्ट झालेली आहेत. त्यावर कर्जमुक्ती हा कायमचा तोडगा नाही, तर शेतीस पूरक व्यवसायांसाठी शेतकऱ्यास प्रोत्साहन देणे हा एक पर्याय ठरू शकतो. त्यासाठी काही धोरणे अस्तित्वात आहेत. पण त्याच्या अंमलबजावणीचा मुद्दा ऐरणीवर येतो, तेव्हा अनेक शेतकरी अशा योजनांच्या लाभापर्यंत पोहोचत नाहीत, असेच उत्तर समोर येते. बालमृत्यू आणि कुपोषणाच्या समस्येसही असेच काही कारण असावे. अशा समस्या सोडविण्यासाठी गरजेचे असलेल्या आर्थिक स्रोतांची राज्याकडे वाणवा असती, तर सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या योजनांचा अनाठायी लाभ उकळणाऱ्या प्रवृत्तींना लगाम घालण्याऐवजी तेथे तिजोरीची तोंडे उघडी करणे सरकारांना शक्य झाले नसते. एका बाजूला अशा योजनांमध्ये अनेक अपात्र लाभार्थी घुसखोरी करून सरकारच्या योजनेचा लाभ घेत आहेत तर दुसरीकडे गरजवंत असंख्य गरीब कुटुंबांना उपजीविकेच्या पुरेशा साधनांच्या अभावी कुपोषणासारख्या समस्येचा दीर्घकाळ सामना करावा लागत आहे, हे विषम सामाजिक चित्र सजग सरकारला आणि सतर्क समाजाला विषण्ण करणारे आहे.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासमोर कुपोषण आणि बालमृत्यू हे एक गंभीर आणि जुनाट आव्हान आहे. विदर्भाच्या आदिवासी परिसरातील मेळघाट असो किंवा मुंबईसारख्या महानगरातील झोपडपट्ट्या असोत, कुपोषणाचे स्वरूप वेगळे असले, तरी त्याची सामाजिक दाहकता सारखीच आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा हे तालुके गेल्या तीन दशकांपासून कुपोषण व बालमृत्यूच्या समस्येने ग्रासलेले आहेत. आजही या भागांत आरोग्य सुविधांचा अभाव दिसतो. अंधश्रद्धांच्या आहारी गेलेल्या समाजास त्यापासून मुक्त करण्यासाठी मोहिमा राबविण्याच्या प्रयत्नांत सरकारी यंत्रणा उदासीन असल्याची खंत सामाजिक संस्था-संघटना आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींकडून व्यक्त केली जाते तर मुंबईतील झोपडपट्ट्यांतील अस्वच्छता, शुद्ध पाण्याचा अभाव, स्थलांतरितांच्या कुटुंबांची आर्थिक विपन्नावस्था अशी अनेक कारणे शहरी कुपोषणाची समस्या उग्र करतात. अशा समस्या सोडविण्यासाठी सरकारी यंत्रणांचा परस्परांत आणि समाजातील सजग घटकांसोबत समन्वय असणे गरजेचे असते. सरकारी योजनांचा लाभ समस्याग्रस्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा समन्वय आवश्यक आहे. मात्र, त्याचाच अभाव असल्याचा आरोप यंत्रणांवर केला जातो. खोटी आकडेवारी देऊन वास्तव लपविण्याचा प्रयत्न झाल्यास गरजवंतांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचत नाहीत, असाही आक्षेप घेतला जातो. त्यामुळे कुपोषण व बालमृत्यू ही केवळ आरोग्याची समस्या नसून ती सामाजिक समस्या आहे. ते आर्थिक विषमतेचे लक्षण आहे. सरकारी आकडेवारीपेक्षा या समस्येचे वास्तव अधिक भीषण आहे, असे ९० च्या दशकातील अभ्यासातूनच उघड झाले, तेव्हा समाज आणि सरकारही हादरले होते. गेल्या वर्षभरात मेळघाटात ४०० हून अधिक बालमृत्यूंची नोंद झाली आहे. मात्र, जन्मतःच मृत असलेल्या अर्भकांची संख्या मोजल्यास हा आकडा त्याहूनही जास्त असू शकतो, असे म्हटले जाते. मुंबईच्या गोवंडी, मानखुर्दसारख्या उपनगरांत बालमृत्यूंचा दर तर केरळसारख्या राज्यांच्या तुलनेतही अधिक आहे. येथील कुपोषणाचे कारणे ही अन्नाच्या अभावापुरती मर्यादित नाहीत तर अस्वच्छता आणि संसर्गजन्य आजारांशीही निगडित असल्याचे स्पष्ट झाले आहे. आजवर शेकडो कोटी रुपये खर्च करूनही या समस्येचे कायमचे निराकरण का होत नाही, याचे कारण केवळ अंमलबजावणीच्या उदासीनतेतच दडलेले असेल, तर त्यावर कठोर उपाययोजना व्हावयास हव्यात. पंतप्रधानपदाचा कार्यभार हाती घेताना नरेंद्र मोदी यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून एक इशारा दिला होता. 'कार्यक्षमता दाखवा, नाही तर पायउतार व्हा' असे त्यांनी तेव्हा बजावले होते. सरकारी कर्मचाऱ्यांना त्या इशाऱ्याचा इतक्यात विसर पडला असेल, तर त्याची जाणीव सतर्क समाजाने करून द्यावयास हवी.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हतबल उद्धव ठाकरे

महाराष्ट्राच्या विशेषतः मुंबईच्या राजकारणात एकेकाळी निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या शिवसेनेला सध्या अनेक आघाड्यांवर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. पक्षांतर्गत असंतोष आणि मोठ्या नेत्यांमधील वाद यामुळे हा गट एका कडीण टप्प्यातून जात असल्याचे चित्र आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे यांनी पक्षाची धुरा सांभाळली; मात्र गेल्या काही वर्षांतील घडामोडींनी पक्षाचे भवितव्य अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलले आहे.

ठाकरे गटातील अंतर्गत अस्वस्थता अलिकडच्या काळात अधिकच स्पष्ट झाली आहे. विशेषतः आदित्य ठाकरे आणि पक्षाचे मुखपत्र 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांच्यातील वाद सध्या चर्चेचा विषय बनला आहे. ठाकरे गटाच्या खासदारांच्या बैठकीत हा वाद विकोपाला गेल्याचे वृत्त आहे. राज्यसभेच्या एका जागेसाठी संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे नाव सुचवल्याने आदित्य ठाकरे संतप्त झाले होते.

सूत्रांच्या माहितीनुसार, आदित्य ठाकरे यांनी राऊतांना थेट इशारा दिला की, '२०२८ ला तुम्ही खासदार म्हणून दिसणार नाहीत.' सोशल मीडियामध्ये तर या बैठकीत 'हायव्होल्टेज ड्रामा' झाल्याचे आणि आदित्य ठाकरे यांनी संजय राऊत यांची कॉलर पकडल्याचे दावे केले आहेत. खरे-खोटे माहीत नाही; पण तणाव प्रचंड वाढला आहे एवढे निश्चित. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनीही या घटनेचा उल्लेख केला आहे. या घटनेमुळे ठाकरे गटातील निर्णय प्रक्रियेवर आणि नेतृत्वावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संजय राऊत हे उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मानले जातात आणि पक्षाच्या धोरणात्मक निर्णयात त्यांचा महत्त्वाचा सहभाग असतो. अशा परिस्थितीत आदित्य ठाकरे यांच्यासारख्या युवा नेत्याने राऊतांना दिलेला इशारा हा पक्षातील वाढत्या मतभेदांचे द्योतक आहे. त्याचबरोबर एकनाथ शिंदे ऑपरेशन टायगर राबवून उबाठा गट फोडणार असल्याच्या चर्चेने उबाठा गटात अस्वस्थता आहे. उबाठा नेत्यांचे म्हणणे आहे की, उद्धव ठाकरे प्रकृतीमुळे महाराष्ट्राचा दौरा करू शकत नाहीत, पण आदित्य ठाकरे तरुण आणि सशक्त आहेत; मग ते का बाहेर पडत नाहीत? खरं तर या प्रश्नाचं उत्तर अगदी सोपं आहे. आदित्य ठाकरेंना वाटतं की, शिवसेना ही त्यांची खाजगी कंपनी आहे, जी आजोबांनी उभारली होती आणि आता वारसा हक्काने ते कंपनीचे मालक आहेत. बाकीचे नेते नोकर आहेत. कार्यकर्त्यांबद्दल त्यांच्या मनात कोणती भावना असेल, याची कल्पनाही करवत नाही. मग नोकर मालकांसाठी झटणार की मालक नोकरांसाठी झटणार? उद्धव ठाकरेंचा स्वभाव कोणालाही न भेटण्याचा आहे. याचा समाचार नीलम गोऱ्हे यांनी घेतला आहे. उद्धव ठाकरे कामे करत नाहीत, कोणाला भेटत नाहीत हे त्यांच्यापासून दूर गेलेले आणि आता दूर जाऊ पाहणारे सगळेच लोक म्हणत आहेत. विशेष म्हणजे पक्ष फुटल्यानंतरही त्यांनी त्यांच्या कार्यात बदल केलेला नाही, ही खंतही गोऱ्हे यांनी व्यक्त केली आहे.



राज्यसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर प्रियांका चतुर्वेदी यांची नाराजीही समोर आली आहे. चतुर्वेदी या ठाकरे गटाकडून राज्यसभेच्या उमेदवारीसाठी इच्छुक होत्या; मात्र संजय राऊत यांनी शरद पवार यांचे नाव सुचवल्याने त्यांची संधी हुकली. संजय राऊत यांनी यावर स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, ठाकरे गटाकडे पुरेसे संख्याबळ नसल्यामुळे प्रियांका चतुर्वेदी यांना पुन्हा उमेदवारी देणे शक्य नव्हते आणि महाविकास आघाडीतील समन्वयासाठी शरद पवार यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. या घटनेमुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील जागावाटपाचा गुंता आणि ठाकरे गटातील नेत्यांच्या अपेक्षांचा संघर्ष समोर आला. तसेच, महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्षाला आपल्या नेत्यांना संधी देण्याची इच्छा असल्याने भविष्यातही अशा प्रकारचे वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उद्धव ठाकरे यांच्या राजकीय प्रवासात देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचे त्यांचे संबंध नेहमीच चर्चेचा विषय राहिले आहेत. २०१७ च्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपा स्वतंत्रपणे लढले होते. या निवडणुकीत शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या, तर भाजपाने ८२ जागा जिंकून शिवसेनेला कडवी टक्कर दिली होती. त्यावेळी भाजपाने काही अपक्षांच्या मदतीने मुंबई महानगर पालिकेत सत्ता स्थापन करणे सहज शक्य होते. तसेही देवेंद्र फडणवीस संख्याशास्त्राचे जादूगार आहेत. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबतचा आदर आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबतची मैत्री जपण्यासाठी पालिकेवर दावा ठोकला नाही आणि मुंबई महानगर पालिकेची सत्ता ठाकरेंकडेच राहू दिली. या घटनेचा उल्लेख अनेकदा फडणवीस यांनी केला आहे की, त्यांनी त्यावेळी 'मोठे मन' दाखवले होते. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबतची युती तोडून राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन केली आणि मुख्यमंत्रिपद स्वीकारले. त्यांनी भाजपाचा 'विश्वासघात' केला आणि फडणवीस यांचासारखा सच्चा मित्र गमावला. फडणवीस हे यारो के यार म्हणून ओळखले जातात. मित्राच्या चुका पोटात घालणारे, त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणारे फडणवीस उद्धव ठाकरेंना सांभाळून घेत होते. परंतु मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी त्यांनी चांगला मित्र गमावला आणि पुढे पक्षही गमावला. संजय राऊत, जे जनतेतून कधीच निवडून येऊ शकत नाही, ज्यांना कोणताच जनाधार नाही, जे सतत बोलत असतात, शिव्या घालत असतात, अशांना उद्धव ठाकरेंनी चाणक्य बनवल्यावर पक्षाची वाताहत होणारच होती.

आजच्या घडीला उद्धव ठाकरे गट एका मोठ्या राजकीय संकटातून जात आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोरीमुळे पक्षाला मोठे खिंडार पडले, पक्षाचे नाव आणि चिन्हही गमवावे लागले. यामुळे उद्धव ठाकरे यांची राजकीय ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. देवेंद्र फडणवीस सध्या राज्याचे मुख्यमंत्री आहेत, तर एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याउलट, उद्धव ठाकरे यांच्याकडे सध्या कोणतेही महत्त्वाचे पद नाही. ही परिस्थिती ठाकरे पिता-पुत्राने स्वतःच निर्माण केली आहे, अशी टीका विरोधकांकडून सातत्याने केली जाते. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी व हिंदुत्वाच्या मुद्यावर शिवसेना उभी केली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी केल्याने त्यांच्या पारंपरिक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. बाळासाहेबांचा वारसा संपुष्टात आणल्याचा आरोपही त्यांच्यावर केला जातो. पक्षातील अंतर्गत वादामुळे कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता वाढली आहे. शिंदे 'ऑपरेशन टायगर' करणार अशा चर्चांमुळे ठाकरे गटातील नेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. उद्धव ठाकरे हतबल आहेत; मात्र या हतबलतेचं श्रेय पूर्णपणे त्यांनाच दिले पाहिजे. असो!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# आता पैसे मोजा अन् दु:ख सांगा!

काळच्या वेदना सहन करीत उद्याच्या सुखासाठी आज चाललेली जिवाची ओढाताण म्हणजे आयुष्य होय. आज १०० पैकी ९९ जण अशाच स्वरूपाचे जीवन जगत आहेत. परिणामी काही जण दु:खी झाले आहेत. अशा दु:खी लोकांना मन हलके करायचे आहे. त्यांना मनातले काही सांगण्यासाठी विश्वासू ऐकणारे हवे आहेत. पण वर्तमानात तुमचे दु:ख ऐकून त्यावर फुंकर घालणारे शोधूनही सापडणार नाहीत. केवळ जखमांवर मीठ चोळणारेच सापडतील. अशा निष्ठूर जगात वावरणाऱ्यांना दिलासा मिळावा म्हणूनच की काय मुंबईत पृथ्वीराज पूनमचंद बोहरा नावाच्या युवकाने 'पैसे मोजा अन् दु:ख सांगा' अशी पाटी लावत चौपाटीवर आगळेवेगळे दुकानच थाटले आहे.

राजस्थानात एखाद्या गावात श्रीमंत माणूस मरण पावल्यावर त्याच्या अन्त्यसंस्काराच्या वेळी पैसे देऊन रडणाऱ्या स्त्रियांना बोलावतात. त्यांना 'रुदाली' असे म्हणतात. आज आपली सोडा, पैसे घेऊन रडणारी माणसं काही केल्या मिळत नाहीत. एवढी निष्ठूरता सर्वत्र दिसत असल्याने पृथ्वीराज पूनमचंद बोहरा या युवकाने दु:ख ऐकून घेत पोट भरण्याचा नवा व्यवसाय थाटणे थोडे हटकेच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे पृथ्वीराज बोहरा हेही राजस्थानी असून पदवीधर आहेत. तत्त्वज्ञान विषयात पारंगत पृथ्वीराज विवाहित असून त्यांना कोरोना काळात बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. तेव्हा चारही बाजूंनी दु:खी-पीडितांचा भरणा होता. कुणीही कुणाचे ऐकून घ्यायला तयार नव्हता. आजही तीच परिस्थिती कायम आहे. म्हणूनच की काय, प्रत्येक जण मनातून निराश झाला आहे. निराशा ही कॅन्सरपेक्षाही भयावह असते, असे पृथ्वीराज बोहरा मानतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार १०० पैकी २५ लोक मानसिक आजाराने पीडित आहेत. या स्थितीत आपण काही तरी करायला हवे, असा विचार पृथ्वीराज बोहरा यांच्या मनात आला. त्यानंतर आपले दु:ख ऐकतो, तुम्ही पैसे मोजा, असा नवा फॉर्म्यूलाच पृथ्वीराजने व्यवसायातून समोर आणला. दु:ख ऐकणे हा व्यवसाय असला तरी यातून त्यांची समाजसेवाही महत्त्वपूर्ण मानायला हवी. ते केवळ दु:ख ऐकत नाही, तर पीडितांना मार्गदर्शन करून त्यांच्या आयुष्यात रंगत आणतात. वाईट गोष्टीतूनही रोजगार निर्मिती होऊ शकते, हेही त्यांनी दाखवून दिले. जिथे दोन घास प्रेमाने खाता येतील अशी पंगत आणि हक्काने मन मोकळं करता येईल अशी संगत आयुष्यात लाभली तर जगण्यातली रंगत वाढत जाते. दुर्दैवाने आज कौटुंबिक संवाद संपलेला आहे. सर्व जण मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकले आहेत. रीलच्या चक्करमध्ये रीअल लाईफ लोक विसरले आहेत. आईला मुलांचे ऐकायला वेळ नाही. वडिलांची व्यथा ऐकण्याची मुला-मुलींची तयारी नाही. मित्रही रोज भेटतात, पण संवाद न साधता घरी जातात. कार्यालयात आपल्या दु:खी सहकाऱ्याला समजून घेण्याची कुणाचीही इच्छा नाही; उलट ते त्याच्या चुका काढून 'खबरीलाल' बनण्यातच धन्यता मानतात. या सर्व कारणांमुळे कुणाचे दु:ख उमगतच नाही. तसे पाहता आपल्या लोकांनी केलेली विचारपूस औषधालाही मागे टाकत असते. आज कुणीही कोणाची विचारपूस करीत नाही. लोक म्हणतात माणसाची सही आणि स्वभाव बदलत नाही. परंतु बोटाला जखम झाली तर सही बदलते. मनाला जखम झाल्यावर स्वभावही बदलतो. असाच प्रकार समाजात वाढलेला आहे. याच कारणाने दु:ख जाणून घेणारे नामशेष होत आहेत. समजा एखाद्याने दु:ख जाणून घेतले तर तो त्यावर फुंकर घालण्यापेक्षा मीठ चोळून माणुसकीला काळिमा फासतो. परिणामी दु:खी-पीडित अधिकच संकटात सापडून निराश होऊन आत्महत्येचा मार्ग पत्करतो. समजा आत्महत्या करण्याचे धाडस न झाल्यास मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांना बळी पडतो. वैद्यकीय उपचारांमुळे त्याची अर्थव्यवस्था डबघाईस जाते अन् तो जिवंतपणीच मरणयातना भोगतो. एवढे सर्व प्रकार मन हलके न झाल्याने होतात. पण समजा पृथ्वीराजने पैसे घेऊन का असेना कुणाचे दु:ख, वेदना समजून घेत त्यावर फुंकर घातल्यास नक्कीच त्याचे मन हलके होते. त्याच्यात जगण्याची आशा वाढते अन् तो पुन्हा उठून धावायला लागतो. याला आपण सर्वांनी समाजसेवाच म्हणायला हवी. समजा आपल्या कृतीने कुणाच्या आयुष्यात आनंदाचे झाड लागत असेल तर नक्कीच ते सर्वांनी लावावे. एकंदरीत पाहता अश्रूंना वजन नसतं, पण निघाल्यावर मन मात्र हलकं होऊन जातं. त्यानुसार आपण लोकांच्या चेहऱ्यावर हास्य आणले तर ती फार मोठी जनसेवा ठरते. येथूनच देशाच्या प्रगतीचाही आलेख उंचावेल.



९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हे तर पुरोगामी भोंदू!

आजच्या काळात एक विचित्र पद्धत समाजात रूढ होत चालली आहे. कोणतेही वादग्रस्त प्रकरण समोर आले की, त्याला लगेच 'भोंदूबाबा' किंवा हिंदुत्वाशी जोडून टाकायचे. मात्र, एखादा मौलाना अडकला तर मात्र 'भोंदू मौलाना' असे कोणी संबोधणार नाही. ही आहे डाव्या विचारांची, पुरोगाम्यांच्या इकोसिस्टिमची पद्धत. विचार करायला वेळच मिळू नये इतक्या तातडीने हॅमरिंगचे कर्तव्य हे लोक चोखपणे बजावतात. जणू काही हा शब्द वापरला की सत्य उघड झाले, दोषी ठरले आणि प्रकरण संपले. सगळे काही हेच लोक ठरवून मोकळे होताना दिसतात. महाराष्ट्रात अशोक खरात प्रकरणात समोर आलेली दिग्गज नावे बघितल्यावर यातील बरेच लोक पुरोगामित्वाचा डंका पिटणारे दिसतात. मग यावर पडदा कसा टाकायचा, तर 'भोंदूबाबा' उचलून धरायचे, व्हायरल व्हिडीओमध्ये देवाची प्रतिमा दिसत असल्यावर लक्ष केंद्रित करायचे आणि त्यावर आक्षेप घ्यायचा. असे विविध फाटे फोडून प्रकरण एखाद्या थोतांडाकडे नेऊन पुरोगाम्यांच्या कृत्यांवर पांघरूण घालण्याचा केविलवाणा प्रयत्न या 'पुरोगामी भोंदूं'नी चालविला आहे. यासंदर्भात लक्षात घेण्याजोगे एक सुभाषित आहे- 'इफ थॉट करप्ट्स लँग्वेज, लँग्वेज कॅन ऑल्सो करप्ट थॉट.' याचा अर्थ असा की, विचार भाषा बिघडवते, पण भाषादेखील विचार बिघडवू शकते. चुकीच्या पद्धतीने चुकीचे विचार कसे पेरले जाऊ शकतात, याचेच उदाहरण आपण या प्रकरणाच्या निमित्ताने बघतो आहोत.

एखादा माणूस चुकीचा निघतो, तेव्हा त्याला ठग म्हणणे, गुन्हेगार म्हणणे, महाठग किंवा अगदी 'भोंदू' म्हणणेदेखील समजून घेता येते; पण त्याला 'बाबा' म्हणणे ही केवळ शब्दांची चूक नसते. ती जाणीवपूर्वक केलेली शाब्दिक चलाखी आहे. या प्रकरणात खरातने स्वतःला कुठेही बाबा संबोधलेले नाही. तसा पेहरावदेखील त्याने केलेला नाही. अत्यंत नीटनेटका आणि सुटाबुटात वावरणारा खरात स्वतःला कॅप्टन संबोधतो. असे असताना 'भोंदू पुरोगाम्यांची' इकोसिस्टिम तो शब्द वापरून संशयाची सावली दाट करते. कारण बाबा या शब्दामागे एक वेगळी परंपरा आहे. या शब्दाचे एक वेगळे स्थान आहे. त्या शब्दात श्रद्धा आहे, अध्यात्म आहे, संस्कार आहेत आणि हे सगळे थेट कोणत्या समुदायाशी जोडले जाते, हे या इकोसिस्टिमला ठाऊक आहे. त्याचाच फायदा घेत संभ्रम निर्माण करून आपले झाकून ठेवणे आणि दुसऱ्याला बदनाम करण्याचा हेतू साध्य करण्यात हे 'भोंदू पुरोगामी' यशस्वी होतात.

अशोक खरात ही व्यक्ती भजन-कीर्तन करणारी नाही, प्रवचन देणारी नाही, अध्यात्म शिकवणारी नाही. ती लोकांच्या श्रद्धेवर नव्हे, तर त्यांच्या भीतीवर आणि स्वार्थावर आपले काम करीत आहे. मग ती व्यक्ती बाबा कशी, हा प्रश्न कुणी विचारत नाही. कारण तो विचारणे कठीण आहे. त्यापेक्षा अशांना भोंदू बाबा म्हणणे सोपं आहे. एका इकोसिस्टिमने ते प्रचलित केलेले असल्यामुळे इतर लोकही कुठलाही विचार न करता त्याच विशेषणाचा सरसकट वापर करताना दिसतात.

खरे पाहिले तर खरातच्या जाळ्यात अडकणारे लोक कोण आहेत, हा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे. हे लोक गोरगरीब, भाबडे, अशिक्षित आहेत का...? की ते सत्तेच्या जवळचे, पैशाच्या बळावर जगणारे, स्वतःच्या फायद्यासाठी काहीही करायला तयार असलेले लोक आहेत...? उत्तर आपल्याला ठाऊक आहे. मात्र, त्याचा ऊहापोह होऊ न देण्यासाठी यंत्रणा कामी लागली आहे आणि त्या यंत्रणेच्या शब्दच्छलात भोळाभाबडा सामान्य माणूस सापडतो आहे. त्या बिचाऱ्याला त्यामागच्या षडयंत्राची जाणीव होण्यासाठी विचार करण्याची संधीच मिळत नाही. माध्यमांमध्येही हा शब्द सहजपणे वापरला जातो. कारण तो 'भोंदू पुरोगाम्यांनी' तसा हॅमर केला आहे. पण, त्या शब्दामागे किती मोठा अर्थ लपलेला आहे, याचा विचार केला जात नाही. समाजात काही लोक स्वतःला पुरोगामी म्हणवतात, धर्मावर टीका करतात, परंपरेवर प्रश्न उपस्थित करतात. पण, तेच अशा प्रकारात अडकतात तेव्हा मात्र त्यांचे पितळ उघडे पडते. मग त्यावर पांघरूण घालण्यासाठी चाललेली त्यांची धडपड केविलवाणी असते.

### शिक्षित की अशिक्षित

आपण नेहमी एक सोपी आणि सरधोपट मांडणी करतो. अंधश्रद्धा ही अशिक्षितपणातून जन्माला येते आणि ती मुख्यतः ग्रामीण, आदिवासी, दलित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांत फोफावते. शिक्षण मिळाले की माणूस विवेकी होतो, तो प्रश्न विचारायला शिकतो आणि अशा गोष्टींपासून दूर राहतो, हा एक सर्वमान्य समज समाजात घट्ट बसलेला आहे. पण अलिकडच्या गाजलेल्या अशोक खरात प्रकरणाकडे नीट पाहिले, तर हा समज केवळ अपुरा नाही तर भ्रामक असल्याचे स्पष्ट होतं. कारण या प्रकरणातील कथित खरातग्रस्त लोक पारंपरिक अर्थाने अंधश्रद्धेचे बळी नाहीत. इथे कुठेही तळागाळातील, भाबड्या, अशिक्षित लोकांची रांग दिसत नाही. उलट या प्रकरणांमध्ये नावे येतात ती उच्चशिक्षित, प्रभावशाली, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि समाजात मानमरातब असलेल्या लोकांची. ते निर्णयक्षमता असलेले, धोरण ठरवणारे, इतरांना मार्गदर्शन करणारे लोक आहेत. तेच जर अशा जाळ्यात अडकताना दिसले, तर मग अंधश्रद्धेचे मूळ नेमके कुठे आहे, हा प्रश्न अधिक गंभीर होतो.

अशोक खरात प्रकरणाने पहिल्यांदा डोके वर काढले तेव्हा सुरुवातीला समाजात एकच प्रतिक्रिया होती- आणखी एक भोंदू बाबा. पण जसजशी माहिती बाहेर येत गेली, तसतसे लक्षात आलं की, इथे खेळ काही वेगळाच आहे. इथे श्रद्धा नव्हती, इथे भक्ती नव्हती. इथे होती एक अदृश्य भीती, एक लोभ, सत्तेच्या जवळ राहण्याची किंवा स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची धडपड. आणि ही धडपड करणारे लोक कोण होते? तेच होते- जे स्वतःला सुशिक्षित, प्रगत, विवेकी म्हणवतात. आपण ज्या गोरगरीब, ग्रामीण, आदिवासी किंवा दलित समाजावर अंधश्रद्धेचा ठपका ठेवतो, त्यांचे वास्तव वेगळं आहे. त्यांच्यासाठी श्रद्धा ही जगण्याचा आधार असते, ती त्यांची मानसिक ताकद असते. ते देवाकडे वळतात. कारण त्यांच्याकडे पर्याय कमी असतात. पण ते स्वतःच्या सन्मानाला सहजपणे तडा जाऊ देत नाहीत. त्यांच्यासाठी इज्जत ही अजूनही काचेप्रमाणे नाजूक आणि जपण्यासारखी असते. उच्चभ्रू, सुशिक्षित वर्गाची मानसिकता वेगळी आहे, हे खरात प्रकरणाने उघड केले आहे. चौकशीत आणखी काय ते बाहेर येईल. सध्या एवढेच म्हणता येते की, खरातने जे काही केले, ते अनैतिकच आहे. फक्त त्याला 'बाबा' हे विशेषण लावून पुरोगामी मंडळींना काही तरी वेगळे सूचित करायचे असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

९२७०३३३८८६

## ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे इतिहास संशोधन क्षेत्रातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या जाण्याने शिवचरित्र आणि मराठा इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणारा व्यासंगी संशोधक गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. पवार यांनी आयुष्यभर महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास दस्तऐवजांच्या आधारे अभ्यासून तो समाजासमोर मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचा त्यांनी वास्तववादी वेध घेतला. त्यांच्या लेखणीत सत्याचा आग्रह आणि अभ्यासाची खोली होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत मोठी हानी झाली आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**विश्वनाथ पंडित**/ठाणे

## विमान प्रवास किती सुरक्षित?

दिल्लीवरून लंडनला निघालेलं विमान तांत्रिक बिघाडामुळे सात तास आकाशात भरकटून पुन्हा दिल्ली विमानतळावर उतरले. विमान सौदी अरबच्या हवाई क्षेत्रात असताना विमानात तांत्रिक बिघाड दिसू लागला. आज विमान क्षेत्रात एवढा हलगर्जीपणा झाला आहे की, विमान प्रवास करताना आता कोणीही जीव मुठीत घेऊनच प्रवास करीत आहे. हेलिकॉप्टर्स अनेक वेळा पडतात, ती शिकाऊ असतात. त्याचं काही वाटत नाही, परंतु ज्यावेळी मोठ्या विमानात तांत्रिक बिघाड होतो किंवा अपघात होतात त्यावेळी सुरक्षिततेबाबत विचार करावा लागतो. ज्यावेळी असा प्रवास तांत्रिक बिघडण्याचा असू शकतो त्यावेळी प्रवाशांची काय हालत होत असेल, याचा विचार केलाय का कधी? एवढं नक्की की, विमानांच्या सुरक्षिततेबाबत नेहमीच संशय व्यक्त केला जात आहे.

**शिरीष बने**/मुंबई, ९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

### महाप्रसाद आणि अन्नाची नासाडी

रामनवमी-हनुमान जयंती उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे वाटप केले जात असते. लग्न, रिसेप्शन, महाप्रसाद या ठिकाणी आपण जातो तेव्हा प्रत्येकाने स्वतःपुरते हेच ठरवावे की, मी अन्नाचा एकही कण पानात टाकणार नाही. मला हवे तेवढेच वाढून घेईन. परंतु चित्र उलटे दिसते. अशा वेळी दुसऱ्या दिवशी बऱ्याच प्लेट्समध्ये अन्न टाकलेले आढळून येते. गजानन महाराजांनी गजानन विजय ग्रंथात पहिल्याच अध्यायात मोठी शिकवण दिली आहे. स्वतः उष्ट्या पत्रावळीतील अन्न शोधन करून एक एक कण वेचून खात होते. त्यातून त्यांना आपल्याला हीच शिकवण द्यायची आहे की, अन्न हे पूर्णब्रह्म आहे. त्याचा एकही कण वाया जाऊ देऊ नये. जेव्हा आपण कुठल्याही महाप्रसादाला जातो तेव्हा फार मोठे अन्न लोकांनी पानात टाकलेले दिसून येते. व्यवस्थापक वारंवार याबाबत सूचना करीत असतात. तरीदेखील याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. ही गोष्ट फक्त महाप्रसाद किंवा कार्यप्रसंगीच अमलात आणावी असे नाही तर रोजच्या दैनंदिन जीवनातही स्वतःपुरती पक्की ठरवावी.

**स्नेहल खंडागळे** /नागपूर

### लग्नसोहळा एक इव्हेंट होतोय

ग्रामीण भागात असलेली एकत्र कुटुंब पद्धती आता नामशेष होताना दिसत आहे. त्यामुळे भावकीचा विचार संपल्यागत झाला आहे. ग्रामीण भागात पूर्वी जे लग्न सोहळे चार-पाच दिवस चालायचे ते आता एकाच दिवसात शहरातल्या एखाद्या मंगल कार्यालयात होऊ लागले आहेत. 'माझ्या घरासमोरच्या अंगणातच मंडप टाकणार, अंगण पुरले नाहीतर संपूर्ण शेतात मंडप टाकणार; पण लग्न माझ्या घरासमोर वा शेतातच होणार' हा जुन्याजाणत्या मंडळींचा तोरा संपुष्टात आला आहे. लोक लग्न सोहळे मंगल कार्यालयात उरकू लागले आहेत. मंगल कार्यालयांत अगदी स्वागतासाठीदेखील माणसे पैसे देऊन भाड्याने मिळू लागली. हवे तेवढे पैसे मोजून घरातील मुलीचे-मुलांचे लग्न मोठ्या थाटात करण्याच्या उद्देशाने गरीब माणूस आणखीनच कर्जाच्या ओझ्याखाली जाऊ लागला. ऋण काढून सण साजरा करण्याच्या प्रकारांत ग्रामीण भागात वाढ होऊ लागली. कार्यालयाचे भाडे, हुंडा, मानपान, मिरवणूक, लग्नबस्ता, सोने आदींचे बाजारीकरण झाले. ग्रामीण भागातील लग्नाची पद्धत बदलत चालल्याने वयोवृद्धांमध्ये खंत व्यक्त केली जात आहे. लग्न म्हणजे दोन घराण्यांचा आनंद सोहळा असतो. अनेक इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या यासाठीचे व्यवस्थापन करतात. यासाठी वर-वधूकडील मंडळी लागेल तेवढा पैसे खर्च करतात. लग्न जर संध्याकाळी असेल तर दुपारच्या वेळेत आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी गाण्यांचा कार्यक्रम ठेवला जातो. लग्नाला गर्दी दिसावी यासाठी सेलिब्रिटींनाही आमंत्रित केले जाते. एकूणच आताच्या लग्न सोहळ्याला इव्हेंटचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**ॲड. रूपाली हिरवे**/पुणे, ९७६६४०५१२५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत महिलेची आत्महत्या ; अंबाजोगाईत खळबळ

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई शहरात आज सकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पठाण मांडवा रोड परिसरात एका अज्ञात महिलेने तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेत संबंधित महिलेचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास ही घटना घडली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, मृत महिलेची ओळख पटली असून वैशाली सुनिल चिकटकर असं सदरिल महिलेचे नाव आहे. मूळच्या जवळगाव येथील रहिवासी असलेल्या वैशाली मुलांच्या शिक्षणासाठी अंबाजोगाईत भाड्याने रहात होत्या. त्यांनी आत्महत्या का केली ? याचे कारणही अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात असून, अधिक तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत आहेत.

# इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभाचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**केज,प्रतिनिधी |** केज येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालय परिसरातील नवीन न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ येत्या रविवारी,दि.२९ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १०-३० वाजता हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती निमंत्रकांकडून देण्यात आली आहे.कोनशिला समारंभ कार्यक्रमाला

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राहणार उपस्थित रहाणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर चंद्रकांत संत आणि माननीय न्यायमूर्ती श्री. अभय ज. मंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. तसेच,या




प्रसंगी माननीय न्यायमूर्ती श्री.सिद्धेश्वर सुंदरराव ठोंबरे (मुंबई उच्च न्यायालय) यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे.प्रमुख उपस्थितीमध्ये राजस्थान ऊच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती श्री. संभाजीराव शिवाजीराव शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच नियोजन बीड चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. सुधीर बाबूराव भाजीपाले आणि केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड. महादेव संपतराव लाड यांनी काम पाहिले आहे.न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या या विस्तारीकरणामुळे केज परिसरातील पक्षकार आणि वकिलांची मोठी सोय होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्यास जास्तीत जास्त नागरिकांनी व कायदे तज्ज्ञांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे स्थळ अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,केज, असुन रविवार,दि.२९ मार्च २०२६,सकाळी १०-३० वाजता हा समारंभ

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

तभा. वृत्तसेवा

**बीड |** बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक २६ मार्च २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ९ एप्रिल २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

# अंबाजोगाई येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निवेदन सादर

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आज अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण निवेदन सादर करण्यात आले. जिल्ह्यात वाढत असलेल्या अंधश्रद्धा, भोंदूगिरी व जादूटोणा प्रकरणांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली.



समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, देवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष किंवा अध्यात्माच्या नावाखाली अनेक ठिकाणी लोकांची आर्थिक फसवणूक तसेच मानसिक छळ होत असून काही प्रकरणांमध्ये महिलांचे शोषणही होत आहे. यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत असून अंधश्रद्धेला खतपाणी मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर ‘महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा’ प्रभावीपणे राबविण्याची मागणी करण्यात आली. प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करून त्याची माहिती जाहीर करावी, तसेच गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील, ग्रामविकास अधिकारी, आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण देण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

तसेच, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि समाजपातळीवर जनजागृती कार्यक्रम राबवावेत, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकृत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## जयभवानीत लिंग समानता ; महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३ यावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

तभा. वृत्तसेवा

**पाटोदा (प्रतिनिधी) |** दिनांक २७ मार्च: पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दि. २७ मार्च २०२६ रोजी ‘लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून पाटोदा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील ॲड.श्रीमती श्वेता किशोर राख आणि ॲड. श्रीमती दिपाली पांडव या उपस्थित होत्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक आणि कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या सत्काराने झाली. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी महिलांचे हक्क, कायदे आणि समाजातील त्यांचे स्थान यावर भाष्य केले.

# ॲड.इस्माईल गवळी व शेख रमीज यांच्यावर दाखल केलेला 353 चा खोटा गुन्हा रद्द करा

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालय व महाविद्यालय, अंबाजोगाई येथील एम.एस.एफ सुरक्षा रक्षकांवर कारवाई करून ॲड.इस्माईल गवळी व शेख रमीज यांच्यावर दाखल केलेला ३५३ चा खोटा गुन्हा रद्द करावा अशी मागणी लोकविकास महाआघाडी आणि सर्वपक्षीय नेते व प्रमुख कार्यकर्ते यांनी अपर पोलीस अधिक्षक, अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना शुक्रवारी निषेध मोर्चा काढून दिलेल्या निवेदनातून केली आहे. ॲड.इस्माईल गवळींसाठी सर्वपक्षीय नेते एकवटल्याचे दिसून आले. यावेळी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला.



खोटे दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, या मागणीसाठी शुक्रवार, दिनांक २७ मार्च रोजी सदर बाजार चौकातून निघून हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात मोठ्या संख्येने सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते सहभागी झाले होते. खोटे गुन्हे मागे घ्या, दवाखाना वाचवा अशा घोषणा देत आंदोलकांनी प्रशासनाचा निषेध नोंदवला. यावेळी लोकविकास महाआघाडी, अंबाजोगाई आणि सर्वपक्षीय नेते व प्रमुख कार्यकर्ते यांच्या वतीने अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## सुरक्षा रक्षकांची संख्या "जैसे थे" ठेवण्यासाठी "मार्ड"च्या डॉक्टरांचे अधिष्ठाता यांना निवेदन!

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** येथील स्वा. रा.तीर्थ ग्रामीण रुग्णालयात अँड. इस्माईल चौधरी यांना मारहाण झाल्याच्या निषेधार्थ संबंधित सुरक्षा रक्षकावर कारवाई करण्यात यावी व अँड. चौधरी व एम आय एमचे नेते शेख रमीज यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे व रूग्णालयातील सुरक्षा रक्षकांना कामावरून काढून टाकण्यात यावे ,यासाठी आज उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. परंतू,दुसरीकडे संबंधित रुग्णालय परिसर,वसतीगृहाची सुरक्षितता लक्षात घेता सुरक्षा रक्षकांची संख्या कमी न करता ती कायम ठेवावी अशा आशयाचे निवेदन "स्वा. रा.तीर्थ रूग्णालयातील "मार्ड" संघटनेच्या डॉक्टरांनी दिल्याने आज दिवसभर रुग्णालयाची चर्चा संपूर्ण बीड जिल्ह्यात होत आहे.



आज दुपारी अंबाजोगाईत अँड.इस्माईल चौधरी यांच्या मारहाण प्रकरणी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला.या मोर्चात माजी आमदार पृथ्वीराज साठे,राष्ट्रवादी काँग्रेस चे राजकिशोर मोदी, अमर देशमुख, मनसेचे सुनिल जगताप, राजेश वाहुळे सह आदी राजकीय कार्यकर्त्यांनी भाग घेवून निषेध केला होता.

तर दुसरीकडे आजच स्वा. रा.तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील (मार्ड) संघटनेतील निवासी डॉक्टरांनी अधिष्ठाता धपाटे यांना एक निवेदन दिले.त्यात म्हटले आहे की,आपल्या महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील सुरक्षा व्यवस्था सुरळीत राखण्यासाठी MSF जवांनाचे मोठे योगदान आहे.रुग्णालयामध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची ये-जा होत असते. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखणे आपत्कालीन परिस्थिती हाताळणे तसेच कर्मचारी व विद्यार्थाची सुरक्षा सुनिश्चित करणे यासाठी MSF जवान अत्यंत आवश्यक आहेत.

तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच शासन निर्णय नूसार सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये सुरक्षा व्यवस्था सक्षम ठेवणे बंधनकारक आहे. त्या नूसार रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय परिसरात पुरेशा प्रमाणात सुरक्षा कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे.जवानांची संख्याबळ कमी झाल्यास सुरक्षेवर विपरीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविद्यालय ,रुग्णालय परिसर व वसतीगृह याची सुरक्षीतता लक्षात घेऊन सुरक्षा रक्षकांची संख्याबळ कमी न करता ती कायम ठेवावी अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

या निवेदनावर डॉ.पुलकित आगरवाल, डॉ.भूमिका धानोरकर डॉ.शिवानी काकडे. डॉ.शिवानी खांडेकर, डॉ.मयूरी इबीतवार,डॉ. इम्रान सय्यद, डॉ.शुभम धांडे,डॉ.संतोष चांदणे सह आदी डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत क्रांतीसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्यावतीने सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

उपक्रमामागील उद्देश समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करणे, रक्ताची गरज भागवणे तसेच गरजू रुग्णांना वेळेवर मदत उपलब्ध करून देणे हा आहे. “रक्तदान हेच जीवनदान” या संदेशाला कृतीत उतरवण्यासाठी संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे. आजच्या काळात अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती व विविध आजारांमध्ये रक्ताची अत्यंत गरज भासते. अशा वेळी प्रत्येक नागरिकाने रक्तदानासारख्या पवित्र कार्यात सहभागी होणे ही काळाची गरज आहे.

सदरील शिबिरात अनुभवी वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली सुरक्षित पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करूनच रक्तदान घेतले जाईल.

संस्थेच्या वतीने सर्व युवक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. प्रत्येकाने स्वतः रक्तदान करावे तसेच आपल्या ओळखीतील किमान दोन व्यक्तींना रक्तदानासाठी प्रेरित करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सन पेस पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी |** गंगामसला येथील सन पेस पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरी करण्यात आले .

स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन पर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्ताराधिकारी अशोक शेळके प्रा.डॉ.सुदर्शन स्वामी, श्रीरंग चव्हाण, मुख्याध्यापक सय्यद आयुब, लक्ष्मण पोटभरे, लक्ष्मीकांत सोळंके,शाळेचे प्राचार्य सबिर कारडो यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना पो. नि. राहुल सुर्यतळ म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी या शाळेची निर्मिती संस्थाचालकांनी गंगामसला या ठिकाणी केली आहे. या संधीचा परिसरातील सर्व पालक व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला पाहिजे असे आव्हान पोलीस केले .संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण पोटभरे यांनी मांडले प्रस्तावना करताना शाळेच्या स्थापनेमागिल भूमिका स्पष्ट करत भविष्यातील विद्यार्थ्यांसाठी उपाय योजना याविषयी माहिती दिली.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी भक्तीपरगीत, महापुरुषांच्या गीतावर तसेच मराठी व हिंदी चित्रपटातील विविध गाण्यावर बहारदार नृत्य करून कलेचा आविष्कार सादर केला.

कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक यांचा यथोचित सन्मान करण्यात आला . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे कर्मचारी सम्राट डोंगरे, गणेश सोळंके सतीष लांडगे, ओंकार नाईकनवरे व शाळेतील सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सनपेस पब्लीक स्कुल गंगामसला शाळेतील विद्यार्थ्यांनी केले .

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई | DNS Bank Ltd. Ambajogai

“दीनदयाळ भवन”, परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड ४३१५१७. फोन-२४४६-२४६९२६/२७फॅक्स-२४४६-२४६९२७

**जा.क्र.दीन.वसुली/सरफेसी/०४/परळी-वै/सीसी-३२/२६८/२०२५-२६** **दिनांक २४.०३.२०२६**

वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षिततिकरण आणि पुर्ननिर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी ॲक्ट २००२ (२रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**ताबा सुचना**

प्रति,

१. **मे.दिग्विजय एंटरप्रायजेस प्रो.प्रा. अर्चना श्रीराम मुंडे ( कर्जदार )**
पत्ताः- माणिक नगर,परळी (वै), ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
२. **श्री.वैजनाथ नामदेव आंधळे**
पत्ताः- वैजनाथ नामदेव, हेळंब, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
३. **श्री. प्रभाकर अंबदास देशमुख**
पत्ताः- अंबदास देशमुख, टी. पी. एस. रोड, शिवाजी नगर, परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
४. **श्री. श्रीराम (प्रभू) प्रभाकर मुंडे**
**पत्ताः-** माणिक नगर,परळी(वै) , ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
५. **श्री. कैलास रमाकांत मुंडे**
**पत्ताः-** स्वाती नगर,परळी, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
६. **श्री. केशव रमाकांत मुंडे**
**पत्ताः-** स्वाती नगर,परळी, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५

**विषय:-**वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षित्तीकरण आणि पुर्ननिर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी ॲक्ट२००२ (२ रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**संदर्भ:-**बँकेची डिमांड नोटीस क्र. SARFAESI/04/7016 - 32/**219**/2025-26 दिनांक ०३.०१.२०२६अन्वये.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक ०३.०१.२०२६ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३(४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.

करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०८.०४.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता (१५ दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदहु वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ठ:-** मालमत्तेचे वर्णन

**(मालमत्ता मालकाचे नाव- श्री. केशव रमाकांत मुंडे व श्री. कैलास रमाकांत मुंडे)**

**मौजे परळी वैजनाथ,जि.बीड येथील स्वाती नगर, नगर परिषद हद्दीतील जुन घर क्र.९२४, नवा घर क्र.११३२ ज्याचा सिटीएस क्र.४४८१, जुना वार्ड क्र.०६, नवा वार्ड क्र.१०, क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम-दक्षिण बाजु २८’६’’,पर्व-पश्चिम-दक्षिण बाजु २९’ आणि दक्षिण-उत्तर ४१ फु., एकुण क्षेत्र. १०९.५४ म्हणजेच ११७८.६५ स्वे.फु.** त्यावरील बांधकामासह त्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

**पुर्व-** सोमनाथअप्पा हालगे यांच्या प्लॉटींगचा भाग
**पश्चिम-** मीरा किशोर काटकर यांचा प्लॉट
**दक्षिण-** २० फु.चा रस्ता
**उत्तर-** लोखंडे यांचा प्लॉट
(“वरील मालमत्ता जशी आहे तशी आहे त्या स्थितीत”)

**अधिकृत अधिकारी**

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई | DNS Bank Ltd. Ambajogai

“दीनदयाळ भवन”, परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड ४३१५१७. फोन-२४४६-२४६९२६/२७फॅक्स-२४४६-२४६९२७

जा.क्र.दीन.वसुली/०२/सरफेसी/टीएल-१२८०/**२७०**/२०२५-२६ दिनांक:- २७.०३.२०२६

परिशिष्ट-४ नियम ८(१)

**ताबा सुचना**

(अचल मालमत्ता)

ज्याअर्थी,

वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अमलबजावणी ॲक्ट -२००२ (दुसरा) अन्वये हस्ताक्षरकर्ता दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई. बँकेचा अधिकृत अधिकारी आहे, आणि सुरक्षा अधिकारी (अमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये बहाल केलेल्या अधिकाराचा वापर करून दिनांक २०.०५.२०२५ ला कर्जदार

१. **मे.मैत्री एजन्सी प्रोप्रा. चैतन्य सुधाकर माने (कर्जदार)**
**पत्ता:-** अजिंक्यतारा निवास, पिताजी सारडा नगरी, जोगाईवाडी, ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
२. **श्री. प्रताप योगीराज निकम**
**पत्ता:-** सायगाव नाका, पोखरी रोड,अंबाजोगाई, जि.बीड ४३१ ५१७
३. **श्री. रणजीत अनिल मंगे**
**पत्ता:-** रेणुका मेडिकल आणि जनरल स्टोअर्स, प्रशांत नगर, अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७

यांचे नावाने नोटीस मध्ये नमुद केलेल्या रक्कम कर्जखाते क्र.**टीएल-१२८०** चे मुद्दल रु. ५,४१,५६५ /- (अक्षरी:- पाच लाख एकेचाळीस पाचशे पासष्ट रु.) अधिक व्याजची सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० (साठ) दिवसाचे आत फेड करण्याची डिमांड नोटीस कलम १३ (२) च्या अंतर्गत जारी करण्यात आली होती.

. त्याअर्थी, कर्जदाराने रक्कमेची फेड न केल्याने दिनांक २१.०७.२०२५ तारखेच्या नोटीसनुसार सदर नियमाच्या ८ सह वाचल्या जाणा-या सदर ॲक्ट कलम १३(४) अन्वये हस्ताक्षरकर्ता अधिकाराचा वापर करुन खाली नमुद केलेल्या मालमत्तेचा ताबा दि. २७.०३.२०२६ रोजी वेळ दुपारी ०१:३० वाजता घेतला आहे. कर्जदार आणि साधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, या मालमत्तेचा व्यवहार त्यांनी करु नये. या मालमत्ते बरोबरचा कर्ज खाते क्र.**टीएल-१२८०** चे मुद्दल रु. ५,४१,५६५ /- (अक्षरी:- पाच लाख एकेचाळीस पाचशे पासष्ट रु.) अधिक पुढील चालु व्याजाचा भरणा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई शाखा-मुख्यशाखा-अंबाजोगाई बँकेला केल्यानंतर होऊ शकेल.

कर्जदार यांना असे सुचित करण्यात येते की, कलम १३ (८) नुसार विहित मुदतीमध्ये थकीत रक्कमेचा भरणा करुन बँकेकडे गहाणात असलेली मालमत्ता मुक्त करुन घेता येईल.

**अचल मालमत्तेचे वर्णन**

कर्जखाते क्र. ७००२-१२८०, शाखा-मुख्यशाखा-अंबाजोगाई चे कर्जदार व गहानदार मे. मैत्री एजन्सी प्रोप्रा. चैतन्य सुधाकर माने यांची कर्ज प्रकरणात तारण स्थावर मालमत्ता मौजे जोगाईवाडी ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील घर क्र.५२२७ ज्यांचा प्लॉट क्र.४० (उत्तरबाजु) जागा सर्वे क्र.३३४ क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम १५ मी. दक्षिण उत्तर पुर्व बाजु २.७० मी. दक्षिण उत्तर पश्चिम बाजु ३.२ मी. एकुण ४४.२५ स्वे.मी. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

**पुर्व:-** प्लॉट क्र.४१ **पश्चिम:-** ९ मी. रस्ता
**दक्षिण:-** संगिता पवार यांचा प्लॉट क्र.४० चा भाग **उत्तर:-** प्लॉट क्र.३९

(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)

दिनांक:- २७.०३.२०२६
स्थळ:- मौजे जोगाईवाडी ता.अंबाजोगाई, जि.बीड

(श्री.देशपांडे अनंत गोपाळराव)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई.
मो.क्र.७६६६५७७९००

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धनगर समाजातील लोकप्रतिनिधींचा मंगळवारी भव्य सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेल्या धनगर समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार सोहळा मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मंगळवारी सकाळी ११ वाजता अंबेजोगाई रोडवरील विष्णुदास मंगल कार्यालयात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया धनगर महासंघाचे राष्ट्रीय सचिव डॉ. पंकज भिवटे, भाजप ओबीसी महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा डॉ. सौ. उज्वलाताई हाके, डॉ. सचिन शेंडगे यांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यात विशेष सत्कारमूर्ती म्हणून राज्यसभेचे नवनियुक्त खासदार रामराव वडकुते, आयपीएस अधिकारी अविनाश बारगळ, सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ विठ्ठल आदित्य यांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेले लातूर मनपाचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, मनपा सदस्य दीपक सूळ, सौ. सपनाताई किसवे, पवन सोलंकर, सौ. छाया बंडगर, श्रीमती चंद्रकला मदने, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जि.प. उपगटनेते महादेव साळुंके, जि प सदस्य बाळू माने, जि. प. सदस्या सौ. शीतल खोमणे, सौ. जयश्री तवले, अहमदपूरच्या नगरसेविका सौ. उषा देवकते, सौ. भाग्यश्री बारमाळे, रेणापूरचे नगरसेवक दत्ता सरवदे, शिरूर अनंतपाळचे उपनगराध्यक्ष अनंत काळे, निलंगाचे नगरसेवक सौ. संगीत पेठकर, स्वीकृत सदस्य गजेंद्र तरंगे, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, निलंगा पं .स. ,विवेक कोकणे, पं. स. सदस्या सौ. जयश्री घोडके, सौ. सिंधू हजारे, पं. स. सदस्य औसा परमेश्वर लांडगे, पं. स. सदस्य जळकोट राहुल झोले,पं. स. सदस्य रेणापूर बालाजी गोटके, सदस्या सौ. अंजली काळे, पं. स. सदस्य चाकूर सौ. सुप्रिया हाके या लोकप्रतिनिधींचाही जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.



## विविध वृत्त...

### परिवहनेतर संवर्गातील वाहनांसाठी MH24- CG ही नवीन मालिका सुरु होणार

**लातूर :** परिवहनेतर संवर्गातील वाहनांसाठी चक२४- उॠ ही नविन मालिका सुरु होणार आहे. या अंतर्गत आकर्षक वाहन क्रमांक मिळविण्यासाठी ३० मार्च २०२६ रोजी मोटार कार, मालवाहू वाहन (दुचाकी वगळून), तसेच तसेच १ एप्रिल, २०२६ रोजी दुचाकी वाहनांसाठी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० पर्यंत अर्ज व विहीत शुल्काचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीडी) स्विकारण्यात येणार आहेत. एखाद्या क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास या आकर्षक क्रमांकाचा लिलाव ०१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता लातूर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षामध्ये केला जाईल. या लिलावात संबंधीत अर्जदाराने वाढीव रक्कमेचा धनादेश सादर करणे बंधनकारक आहे. एखाद्या अर्जदाराने जास्तीचा वाढीव रक्कमेचा धनाकर्ष सादर केल्यास त्या अर्जदारास आकर्षक पसंती क्रमांक राखीव ठेवण्यात येईल, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी कळविले आहे.

### लातूर जिल्हा परिषद विषय समित्यांच्या निवडीसाठी ३० मार्च रोजी विशेष सभा

**लातूर :** जिल्हा परिषद विषय समित्यांच्या सभापती पदाच्या निवड करण्यासाठी पीठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लातूर जिल्हा परिषद समिती सभापती पदाच्या निवडीसाठी ३० मार्च, २०२६ रोजी दुपारी २ वाजता कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद लातूर येथे विशेष सभा आयोजित करण्यात आलेली आहे. विशेष सभेच्या अनुषंगाने जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती यांना सदर विशेष सभेची नोटीस (नमुना-अ) देण्यात आली आहे, असे पीठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांनी कळविले आहे.

### मतदार यादी विशेष सघनपुनरीक्षण कार्यक्रम; लातूर तालुक्यातील मतदारांनी तपशील अद्ययावत करण्याचे आवाहन

**लातूर :** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार, लातूर जिल्ह्यात 'विशेष सघन पुनरावलोकन' (SIR) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेतंर्गत मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी आणि ती अधिक अचूक करण्यासाठी लातूर तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय यांच्या वतीने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने धूसर किंवा अस्पष्ट छायाचित्र दुरुस्त करणे), समान लोकसंख्याशास्त्रीय नोंदी तपासणी व दुरुस्ती, मतदारांचे २००२ च्या मतदार यादीशी नकाशा संलग्नीकरण/मॅपिंग आणि बीएलओ सोबत कॉल बुकिंग इत्यादी कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. हे कामे प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बीएलओ यांनी आपल्या नेमणुकीच्या क्षेत्रातील मतदारांना समक्ष भेटून लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. मतदार यादीशी नकाशा संलग्नीकरण/मॅपिंगचे काम ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे २३५ लातूर शहर विधानसभा मतदार संघ आणि २३४ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी आपल्या रहिवासी मतदान केंद्रातील बीएलओ यांच्याशी समक्ष भेट घेऊन २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे आई, वडील, आजी किंवा आजोबा यांचा तपशील https://voters.eci.gov.in/searchInSIR/SZU-4DPDF-JKSQWODSE या अधिकृत लिंकवर किंवा ECINET या ॲपवर शोधून बीएलओ यांना माहिती उपलब्ध करून द्यावी. विवाहित महिलांनीदेखील त्यांच्या माहेरच्या (२००२ मधील) नातेवाईकांची माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण स्पर्धेत कु.पंकजा पांडुरंग कापसे प्रथम

**लातूर :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील ग्रंथालय विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या वाचनासोबतच लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी ''उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण'' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ऑगस्ट २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आली.या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण १३९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचून त्यावर १००० शब्दांपेक्षा अधिक शब्दांत परीक्षण लिहून ग्रंथालयात सादर केले. या कालावधीत विद्यार्थ्यांकडून एकूण ३१२ पुस्तकांचे परीक्षण ग्रंथालयात जमा झाले.या स्पर्धेत कु. पंकजा पांडुरंग कापसे (एम.कॉम प्रथम) यांनी ''पैसे नव्हे तर पैशाचे मानसशास्त्र'' या पुस्तकाचे उत्कृष्ट परीक्षण लिहून प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक कु. पोरे धनश्री युवराज (बी.कॉम द्वितीय) यांनी ''द एव्हरीडे हिरो मॅनिफेस्टो'' आणि कु. लक्ष्मी बस्वराज कोडे (बी.कॉम प्रथम) यांनी ''महानायक'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला. तृतीय क्रमांक कु.चैताली कुमार चिकटे (बी.सी.ए प्रथम) यांनी ''द सीक्रेट (रहस्य)'' आणि कु.मनीषा गजानन पवार (बी.कॉम प्रथम) यांनी ''सार्थ श्री ज्ञानेश्वरी'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला.या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलन कार्यक्रमात मिमिक्री कलाकार श्री शिवपुत्र स्वामी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## ग्रंथालय चळवळीने संस्कृती, संस्काराचे संवर्धन करावे : बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** आज मोबाईल हे गरजेचे साधन झाले आहे,पण त्याचा अतिवापर कामाचा नाही. त्याच्या आहारी गेल्यामुळे नातेसंबंधात दुरावाही वाढतो. अशावेळी सार्वजनिक ग्रंथालयांनी मानवी मूल्य, संस्कृती,संस्कार संवर्धनाचे काम करावे, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. अमर ज्योती ग्रंथालयाच्या ईमारतीसाठी २० लाखांचा निधी देण्याची घोषणा केली.

वडवळ (ना.) येथील अमर ज्योती ग्रंथालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशन वटसिध्द नागनाथ मंदिर प्रांगणात आज शनिवारी पार पडले. उद्घाटन बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार हे होते. मंचावर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.नागोराव कुंभार, राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, माजी अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार, कोषाध्यक्ष भीमराव पाटील, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक,प्रमुख कार्यवाह राम मेकले,कार्याध्यक्ष प्रभाकर




कापसे,जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे,जि.प.सदस्य भानुदास पोटे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, अधीक्षक अनील बावीसकर,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, उपाध्यक्ष युवराज जाधव,सरपंच मुरलीधर सोनकांबळे,एल.बी.आवाळे,अंबादास पाटील,किरण बाबळसुरे,डॉ.अनिल बंड आदींची उपस्थिती होती.

मोबाईलचा अतिवापर कमी व्हायला हवा,मोबाईलमुळे नाते विस्कळीत होत आहेत, माणसं एकमेकांना बोलायला,पहायला तयार नाहीत . माणसा-माणसामधला संवाद कमी होत आहे,खरे तर संपत्तीपेक्षा संतती महत्वाची असल्याने पालकांनी त्यांच्याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे असे सांगून बाबासाहेब पाटील पुढे म्हणाले की, कोणतेही काम करताना त्यात प्रामाणिकता हवी. आपण केलेल्या कोणत्याही कामातून आनंद मिळाला पाहिजे. लोकांना शिक्षण,आरोग्य,न्याय,समाधान देता यावे, त्याचे प्रश्न सुटावेत यासाठी राजकारण करता येते. आज वाचन संस्कृती वाढण्यासाठी जीव ओतून काम करावे लागेल. ग्रंथालयाचे प्रश्न सोडविण्यासाठी,आपण ग्रंथालय संघाबरोबर आहोत, असा शब्द देवून अध्यात्मासोबतच संस्कृतीचे जतन झाले पाहिजे. ते टिकविण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करत आहेत. आज लोकांना वेळ नाही म्हणून लेखकांनी लहान लहान पुस्तके लिहावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्याकडे मंदिराच्या उभारणीसाठी निधीची अधिक मागणी होते,मंदिरे झाली पाहिजेत पण जिल्हा परिषदांच्या शाळा,व्यायामशाळा,क्रिडांगणे,जिम उभारणीसाठी पुढे कोणी येत नाहीत याबद्दल त्यांनी व्यक्त केली.सार्वजनिक ग्रंथालये ही ज्ञान मंदिरे असल्याने,अमर ज्योती ग्रंथालय इमारतीसाठी २० लाखांचा निधी देण्याची त्यांनी घोषणा केली.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी यावेळी बोलताना मनाचा गरजा अर्थपूर्ण होण्यासाठी ग्रंथांचे विशेष महत्व आहे असे सांगितले. ग्रंथांमध्ये प्रचंड शक्ती आहे. माणसाचे ते अंतरंग बदलून टाकतात. ते माणूस घडवितात,माणसाला उर्जा देतात असे सांगून ग्रंथ वाचन हे समाजाच्या प्रगतीचे लक्षण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सगळ्यात जास्त महत्व ग्रंथाला दिले, त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांनी समाजप्रबोधन,दर्जेदार ग्रंथांचे प्रदर्शन भरवित,गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत. तसेच शासनाने त्यांच्याकडील विश्वकोश सार्वजनिक ग्रंथालयांना भेट द्यावेत अशा सूचना केल्या डॉ.नागोराव कुंभार यांनी यावेळी केल्या..

अमर ज्योती ग्रंथालयाचे अध्यक्ष वैजनाथप्पा नंदागवळे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यवाह राम मेकले यांनी केले. प्रांभी वटसिध्द नागनाथ, डॉ.एस.आर.रंगनाथन आणि ॲड.त्र्यंबकदास झंवर यांच्या प्रतिमांचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दिवं.अजितदादा पवार,शिवराज पाटील चाकूरकर,डॉ.जनार्दन वाघमारे,गंगाधर पटणे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.पीएमश्री जि.प.शाळा टाकळवाडीच्या विद्यार्थीनी चमूने स्वागत गीत सादर केले.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते रवींद्र कालेकर यांना कै.ॲड.त्र्यंबकदास झंवर आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष हावगीराव बेरकीळे यांना जीवन गौरव पुरस्कार,किनगावच्या स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अशोक मुंढे यांना कै.मारोती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्य शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त धनंजय पवार व सूर्यकांत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.सी.पाटील व शादुल शेख यांनी केले. शिवानंद कल्याणे यांनी आभार मानले. या वेळी जिल्ह्यातील जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी,सार्वजनिक ग्रंथालयाचे कर्मचारी,पदाधिकारी,शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकरकमी रूपांतरण अधिमूल्याचा भरणा 31 मार्चपर्यंत करा: नऱ्हे-विरोळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अकृषिक, वाणिज्य आणि औद्योगिक वापरासाठी असलेल्या जमिनीवर यापुढे वार्षिक अकृषक कर आकारला जाणार नाही. त्याऐवजी, अशा सर्व जमिनींसाठी जमीनधारकांना आता 'एकरकमी रूपांतरण अधिमूल्य' भरावयाचे असून लातूर तालुक्यातील नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

यासाठी संबंधित खातेदारांनी त्यांच्या सात-बारा उताऱ्यावरील नोंद असलेल्या क्षेत्राकरिता, चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार १००० चौ. मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी ०.१० टक्के, १००१ ते ४००० चौ. मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी ०.२५ टक्के आणि ४००१ चौ. मीटरपुढील क्षेत्रासाठी ०.५० टक्के अधिमूल्याचा भरणा करणे आवश्यक आहे. हा कर केवळ एकदाच भरावयाचा असून, त्यानंतर जमीनधारकांना कोणताही महसुली कर भरण्याची आवश्यकता राहणार नाही (याबाबत शासन निर्णयातील इतर सर्व तरतुदी लागू राहतील). तरी लातूर तालुक्यातील सर्व संबंधित खातेदारांनी आपल्या जमिनीवरील हे एकरकमी रूपांतरण अधिमूल्य ३१ मार्च २०२६ पर्यंत जमा करावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे- विरोळे यांनी केले आहे.

## डॉ. जयसिंगराव पवार यांच्या स्मरणार्थ आज श्रद्धांजली सभा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे २६ मार्च रोजी कोल्हापूर येथे निधन झाले. मराठ्यांच्या इतिहासाचे दीर्घकाळ संशोधन आणि लेखन करणारे इतिहासकार म्हणून ते ओळखले जात. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूर येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाऊंडेशनच्या वाचनालयात या सभेचे आयोजन करण्यात आले आहे

डॉ.जयसिंगराव पवार यांचा संशोधन विषय शिवपुत्र राजाराम महाराजांच्या इतिहासाशी संबंधित होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या हौतात्म्यानंतर स्वराज्याची धुरा जवळपास ११ वर्षे समर्थपणे सांभाळणाऱ्या आणि औरंगजेबाला



झुंज देणाऱ्या या शिवपुत्राचे कार्य त्यांनी संशोधनातून प्रकाशात आणले. यासाठी त्यांनी रायगड ते जिंजी किल्ला प्रवास करून अभ्यास केला. राजाराम महाराजांच्या अभ्यासादरम्यान त्यांचे लक्ष करवीर संस्थानाच्या संस्थापिका महाराणी ताराबाई साहेबांच्या इतिहासाकडे गेले. त्यामुळे त्यांनी 'महाराणी ताराबाई' हा ग्रंथ लिहिला.

डॉ. पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' हा ग्रंथ संपादित केला. बखरी,कथा, चित्रपट आणि कादंबऱ्यांमुळे निर्माण झालेल्या संभाजी महाराजांच्या प्रतिमेवरील गैरसमज दूर करून त्यांनी त्यांच्या पराक्रमाचे खरे स्वरूप लोकांसमोर आणले. इतिहास संशोधन करत असतानाच त्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा सखोल अभ्यास करून 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' तयार केला. हा ग्रंथ संशोधन, संपादन आणि लेखन यांचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. शाहू महाराजांचे विचार केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देश-विदेशात पोहोचावेत, यासाठी त्यांनी त्यांच्या चरित्राचे विविध भाषांमध्ये भाषांतर व्हावे, यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या दीर्घ काळ चाललेल्या संशोधन व लेखन कार्यास अभिवादन करण्यासाठी या सभेला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, राजर्षी शाहू प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या लातूर शाखेतर्फे करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात आज 'उल्लास' नवभारत साक्षरता मूल्यमापन चाचणी

### ४,७०२ परीक्षार्थींचे भवितव्य ठरणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** केंद्र शासन पुरस्कृत 'उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षातील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी येत्या रविवार, २९ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील ४ हजार ७०२ असाक्षर व्यक्ती या परीक्षेला बसणार असून, जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

देशातील १५ वर्षे व त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) आणि संख्याज्ञान विकसित करण्यासाठी 'उल्लास' कार्यक्रम सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत राबवला जात आहे. केवळ साक्षरता न थांबता, या व्यक्तींना आर्थिक साक्षरता, कायदेविषयक ज्ञान, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य जागरूकता आणि कुटुंब कल्याण यांसारखी महत्त्वाची जीवनकौशल्ये प्राप्त करून देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. राज्य शासनाने १४ ऑक्टोबर २०२२ च्या निर्णयानुसार ही योजना स्वीकारली असून, शाळा हे या कार्यक्रमाचे मुख्य अंमलबजावणी केंद्र आहे.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा रविवार, २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. प्रत्यक्ष पेपरसाठी ३ तासांचा वेळ असेल, तर दिव्यांग परीक्षार्थींना ६० मिनिटे जादा वेळ दिला जाईल. एकूण १५० गुणांची ही चाचणी तीन भागांत विभागलेली आहे. उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागात किमान ३३ टक्के (१६.५ गुण) आणि एकूण सरासरी ३३ टक्के (४९.५ गुण) मिळवणे अनिवार्य आहे. विशेष सवलत म्हणून कोणत्याही एका भागात कमी पडलेले जास्तीत जास्त ५ गुण (ग्रेस) दिले जाऊ शकतात. ही चाचणी मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड यांसह विविध प्रादेशिक भाषांत उपलब्ध असेल. उत्तरपत्रिकेसाठी फक्त काळ्या किंवा निळ्या शाईचा बॉलपेन वापरणे बंधनकारक आहे. ज्या असाक्षरांनी उल्लास पवर अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांना परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रावर नोंदणी करून चाचणी देता येईल.

**आवश्यक कागदपत्रे**

परीक्षार्थींनी केंद्रावर येताना स्वत:चे मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा बँक पासबुक यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच, नोंदणी फॉर्मसाठी एक पासपोर्ट फोटो सोबत ठेवावा (फोटोची सक्ती नाही).

**लातूर जिल्ह्याची कामगिरी**

लातूर जिल्ह्यासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता एकूण १७,२३६ नवसाक्षरांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी २३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या चाचणीत १२,५३४ व्यक्ती यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्या आहेत. आता उर्वरित ४,७०२ असाक्षरांसाठी २९ मार्च रोजी ही चाचणी होणार आहे.

साक्षरता ही प्रगतीची पहिली पायरी आहे. जिल्ह्यातील उर्वरित सर्व असाक्षर व्यक्तींनी २९ मार्च रोजी आपल्या जवळच्या शाळा-परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून ही चाचणी द्यावी. या प्रक्रियेत शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवून या मोहिमेला यशस्वी करावे, आवाहन शिक्षणाधिकारी (योजना) तृप्ती अंधारे यांनी केले आहे.

## पवन भांडेकर 'स्वगुणवाढ' पारितोषिकाचा मानकरी; रेणुका जोशी उत्कृष्ट वाचक

### दगड फोडणाऱ्या पवनची प्रेरणादायी यशोगाथा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च :** प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश कसे मिळवता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण पवन भांडेकर याने घालून दिले आहे. दगड फोडत, फरशी बसवत आणि गिलावा करत शिक्षण घेतलेल्या पवनने 'स्वगुणवाढ पारितोषिक' पटकावत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर कु. रेणुका जोशी हिने उत्कृष्ट वाचक पुरस्कार मिळवत वाचन संस्कृतीची जोपासना केली आहे.

इतरांशी तुलना न करता स्वतःशीच स्पर्धा करावी, या उद्देशाने प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी मागील चौदा वर्षांपासून 'स्वगुणवाढ पारितोषिक योजना' राबविली आहे. या योजनेअंतर्गत दहावीच्या तुलनेत बारावीमध्ये सर्वाधिक गुणांची वाढ करणाऱ्या विद्यार्थ्याला कै. गुरुनाथ जगदाळे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाते.

यावर्षी हे पारितोषिक पवन भांडेकर याने मिळविले. दहावीमध्ये ६०.४० टक्के गुण मिळविल्यानंतर त्याने फेब्रुवारी २०२५ च्या बारावी परीक्षेत ८४.८३ टक्के गुण मिळवत तब्बल २४.४३ टक्क्यांची वाढ नोंदवली. विशेष म्हणजे, मजुरीची कामे करत त्याने हे यश संपादन केले. या योजनेमुळे आत्मविश्वास वाढल्याची भावना त्याने व्यक्त केली. तसेच संगीत विषयात सर्वाधिक गुण मिळवत त्याने स्व. बालाजी उत्रेश्वर खराडे स्मरणार्थ 'उदयोन्मुख संगीत साधक' पुरस्कारही पटकावला. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठीही प्रा. डॉ. जगदाळे विविध उपक्रम राबवितात. त्याचाच एक भाग म्हणून वर्षभरात सर्वाधिक अवांतर पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला गौरविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी कु. रेणुका जोशी हिने ५१ अवांतर पुस्तकांचे वाचन करून उत्कृष्ट वाचक पुरस्कार मिळविला. वाचनामुळे साहित्याचा निखळ आनंद मिळाल्याचे तिने सांगितले.

या दोन्ही विद्यार्थ्यांचा सन्मान वार्षिक स्नेहसंमेलनात सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली



जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. रमेश पारवे, डॉ. संतोष पाटील, डॉ. सुभाष कदम, डॉ. नितेश स्वामी, कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे व प्रकाश खराडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ईदगाह परिसरातील स्फोट हा दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न : सेक्युलर फोरम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २८ मार्च-**

ईदच्या दिवशी दि.२१ मार्च रोजी ईदगाह परिसरात घडलेल्या भिषण स्फोट हा दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न असल्याची शक्यता असुन या स्फोट प्रकरणाची उच्चस्तरीय व निःपक्ष चौकशी करावी, अशी मागणी राज्याचे राज्यपाल व मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली असल्याची माहिती सेक्युलर फोरमच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

दि.२१ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता ईदच्या नमाजासाठी पन्नास हजाराहून अधिक मुस्लिम बांधव, महिला, लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान याचवेळी ईदगाह मैदानाच्या जवळच एका मोटारसायकलस्वाराचा भिषण स्फोट झाला. प्रत्यक्षदर्शी व व्हिडीओ पुराव्यानुसार संबंधित व्यक्तीने आपल्या शरीराला स्फोटके व काचाच्या बाटल्या, लोखंडी खिळे बांधले होते. त्यामुळे हा स्फोट अधिकच



घातक ठरला. या स्फोटात मोटारसायकलस्वार व मोटारसायकल पूर्णपणे जळून खाक झाली. त्यामुळे हा स्फोट दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न असू शकतो, अशी शक्यता आहे. हा स्फोट गर्दीत झाला असता तर शेकडो निरपराध नागरिकांचा जीव गेला असता. एवढा भिषण स्फोट झाल्यानंतरही पोलिसांनी हे स्फोट प्रकरण गांभिर्याने न घेता उलट घटनास्थळाची तातडीने स्वच्छता केली. त्यामुळे पोलिसांच्या या तपासावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, या प्रकरणाचा तपास सीबीआय किंवा एनआयएकडे सोपविण्यात यावा, फॉरेन्सिक व टॉक्सीलॉजिकल तपास करुन अहवाल सार्वजनिक करावा, तपास प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, घटनेमागील सूत्रधार तथा संघटना याचा शोध घेवून मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करावा व या घटनेची सत्यशोधन समिती तातडीने स्थापन करावी, अशी मागणी सेक्युलर फोरमच्या वतीने करण्यात आली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेस माजी गृहराज्यमंत्री डॉ.माधवराव किन्हाळकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, अॅड.एम.ए.रहेमान सिद्दीकी, वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष फारुख अहेमद, माजी महापौर अब्दुल सत्तार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, प्रदीप नागापूरकर, मनसेचे मॉन्टीसिंघ जहागिरदार, एकनाथ मोरे, श्याम कांबळे, राहुल सोनसळे आदीसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची उपस्थित होती.

# मराठवाड्यातील रेल्वे विकासाला गती मिळणार; खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २८ मार्च-**

मराठवाड्यातील रेल्वेच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने सकारात्मक विचार करून ते सर्व प्रश्न मार्गी लावले जातील असा विश्वास केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवी यांनी आज व्यक्त केला आहे. खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मराठवाड्यातील विविध रेल्वे प्रश्नांच्या अनुषंगाने आज केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवी यांची भेट घेतली. मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांबाबत सविस्तर निवेदनही त्यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिले आहे. यावेळी महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन हेही उपस्थित होते. त्यानंतर केंद्रीय मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत विकास कामे पूर्ण करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे मराठवाड्यातील रेल्वे विकासाच्या कामाला आता गती मिळणार आहे.



नांदेडपुणे आणि नांदेडहैदराबाद वंदे भारत ट्रेन तात्काळ सुरू करण्यात यावे . धर्माबाद रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस व सुपरफास्ट गाड्यांना थांबा देण्यात यावा. नांदेडबिदर नवीन रेल्वेमार्गाच्या कामास महाराष्ट्रातील भागात तातडीने सुरुवात करावी . बोधनबिलोलीनरसीलातूर रोड (१३४ किमी) या नवीन रेल्वेमार्गास मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खा . डॉ. अजित गोपछडे यांनी यावेळी केली.

नांदेड - बीदर या रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी केंद्र सरकारने कर्नाटक व तेलंगणा राज्य सरकारांशी समन्वय साधून त्यांच्या ५० टक्के खर्चाच्या वाट्याबाबत आवश्यक पुढाकार घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली. शिवाय मुदखेडधर्माबाद (४९ किमी) आणि परळी वैजनाथलातूर रोडउदगीर (९६ किमी) या रेल्वे मार्गांना हैदराबाद व सिकंदराबाद विभागातून नांदेड रेल्वे विभागात समाविष्ट करण्याचा केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे प्रस्ताव मांडण्यात आला. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाहीचे आश्वासन दिले. या पुढाकारामुळे मराठवाडा, विशेषतः नांदेड परिसरात रेल्वे जाळ्याचा विस्तार आणि प्रवासी सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २८ मार्च-**

मुदखेड तालुक्यात मागील आठवड्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणच्या आपघातात दोन इसमांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना दि.२७ मार्च रोजी मुगट पाटी जवळ भरधाव वेगाने धावणाऱ्या अज्ञात वाहनाने एका दुचाकी स्वारास चिरडले असून या अपघातात मुदखेड शहरातील कन्हैयासिंग विठ्ठलसिंग राठोर (ठाकूर) वय ४९ यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



कन्हय्यासिंह राठोर हे नांदेड शहरात खरेदी करून घराकडे परत येत असताना दि २७ मार्च रात्री ९:३० च्या सुमारास भरधाव वेगातील अज्ञात मोठ्या वाहनाने दुचाकी स्वार कन्हेय्यासिंह राठोर यांना चिरडल्याची घटना मुगट पाटी जवळ घडली आहे.

यामध्ये कन्हैयासिंग विठ्ठलसिंग राठोर राहणार शिवाजीनगर मुदखेड यांचा जागीच मृत्यू झाला आहे. यानंतर घटनेच्या ठिकाणावरून अज्ञात वाहन फरार झाला आहे.

यापूर्वी हायवा दुचाकी अपघातात मुदखेड शहरातील सुवर्णकारागीर संतोष टाक यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. यानंतर काही दिवसांपूर्वीच माळकोठा या ठिकाणी टिप्परने दुचाकी उडविल्याने यामध्येही एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे . यानंतर आता आमलेट विक्रेता गावाकडे परत येत असताना अज्ञात वाहनाने चिरडल्याने कन्हैयासिंग विठ्ठलसिंह राठोड (ठाकूर) यांचा हा जागीच ठार झाला आहे .

वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याने अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत. यामुळे निष्पाप लोकांना जीव गमवावा लागत आहे. मुदखेड पोलीस ठाण्यात अपघाताच्या घटनेचा अज्ञात वाहनाच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास सपोनि बी.आर.कांबळे हे करित आहेत.

# नांदेड येथे शिवकालीन प्राचीन नाणी व आयुधे यांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ मार्च-**

येथील जुन्या नांदेड मधील ऐतिहासिक नंदगिरी किल्ला येथे दि.३ एप्रिल ते दि.५ एप्रिल २०२६ या कालावधीत छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेल्या शिवकालीन सुवर्ण होन, प्राचीन नाणी व पुरातन शस्त्रे व आयुधे यांचे आगळे वेगळे अभिनव प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

सांगलीचे भूमिपुत्र व येथील अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव त्यांच्या अभिनव संकल्पनेतून नांदेडचे प्राचीन व ऐतिहासिक वैभव असलेल्या नंदगिरी किल्ल्याचे जतन व संवर्धन करणारी नंदगिरीचे किल्लेदार यांची एक मोठी फौज तयार झाली आहे. सदर किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्राचीन व ऐतिहासिक वैभव असलेला दुर्मिळ ठेवा यांचे सर्वांना दर्शन व्हावे व जाज्वल्य इतिहास डोळ्यासमोर उभा राहावा यासाठी या अभिनव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राज्याभिषेकाच्या वेळी सोन्याचे होन हे नाणे प्रचलित केले होते. त्या पैकी एक अस्सल सुवर्ण होन (सुवर्ण नाणे) हा ऐतिहासिक अमूल्य ठेवा अशोकसिंघ ठाकूर यांनी संग्रहित केलेला असून त्याचे दर्शन दि. ३ एप्रिल रोजी सर्वांना घडणार आहे आणि महाराष्ट्रात पहिल्यांदा एखाद्या किल्ल्यावर अशा पद्धतीने वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन भरत आहे.

श्री चक्रधर संग्रहालय,निलंगा (लातूर) यांनी संग्रहित केलेल्या इसवी सन पूर्व ६०० पासूनची दुर्मिळ नाणी यांचे प्रदर्शन तसेच महाराष्ट्र व कर्नाटकातील ऐतिहासिक असलेल्या १२ किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन दि.४ एप्रिल रोजी सर्वांना पहावयास मिळणार आहे.

# भोकर शहरात अवैध दारु विक्री

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. २८ मार्च-**

शहरात अनेक ठिकाणी अवैध दारु विक्रि मोठ्या प्रमाणात होत असून याकडे संबधित विभागाचे अर्थपूर्ण दूर्लक्ष दिसून येते.गेली अनेक दिवसापासून शहरात जागोजागी अवैध दारुची विक्रि जोमात सूरु असून मद्यपीना पहाटे चार पासून रात्री बारा वाजेपर्यंत सहज अवैध दारु उपलब्ध होत आहे राज्य उत्पादन शूल्क विभागाने याकडे कमालीचे दूर्लक्ष करित आहेत.मद्यपींना देशी दारु कूठेही कोणत्याही वेळेत उपलब्ध होत असल्याने दारु पिवून तरुण मूले रस्त्याने कूठेही पडत आहेत आपल्या परिवाराचा कसलाही विचार न करता दिवसभर दारु पिणाऱ्यांची संख्या वाढली आहे. तरुणांनी या देशी दारुच्या आहारी जावून आपले आयूष्य बर्बाद करुन घेत असल्याचे निदर्शनास येत आहे.अवैध दारु विक्रि करणाऱ्यावर कूणाचेही अंकूश राहिलेले नाही परिणामी अवैध दारु विक्रेत्याचे मनोबल वाढले आहे.संबधित विभागास अवैध दारु विक्रि होत असल्याची कल्पना असताना देखील झोपेचं सोंग घेत असल्याचे निदर्शनास येत आहे या विभागाकडून महिनेवारी भेटी देत अवैध दारु विक्रेत्याना रान मोकळे करुन दिल्याची चर्चा शहरात होत आहे.अवैध देशी दारू विक्रेत्याचे व संबधित विभागातील कर्मचाऱ्यासोबत अर्थपूर्ण संबध असल्याने हा दारु विक्रिचा व्यवसाय जोमात सूरु असल्याचे पहावयास मिळत आहे.याकडे वरिष्ठांनी लक्ष देवून होत असलेली अवैध दारु विक्रि बंद करण्याची मागणी शहरातील नागरीक करित आहेत.

**संबधिताचे अर्थपूर्ण दूर्लक्ष**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते आ.बोंढारकरांच्या कार्यालयाचे उद्घाटन

**नांदेड** -नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ.आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हिंगोली गेट येथील शिवनेरी या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आज रविवार दिनांक २९ मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचे हस्ते करण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजता पार पडणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे यांच्यासह नामदार हेमंत पाटील,आमदार बालाजीराव कल्याणकर,आमदार बाबुराव कदम कोहळीकर आदींची उपस्थिती राहणार आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शेतकरी , सर्वसामान्य नागरिक आणि जनतेसाठी हे संपर्क कार्यालय सदैव खुले असणार आहे. त्यामुळे जनकल्याणासाठी शिवनेरी जनसंपर्क कार्यालय आज पासून लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे . शिवनेरी जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यास नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व आजी - माजी लोकप्रतिनिधींनी ,आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकानी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नांदेड दौऱ्यावर

**नांदेड** -राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार २९ मार्च रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.रविवार २९ मार्च २०२६ रोजी ५.१५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने हिंगोली गेट नांदेडकडे प्रयाण. सायं. ५.३० वा. शिवनेरी शिवसेना पक्ष कार्यालयाचे उद्घाटन. स्थळ- हिंगोली गेट नांदेड. सायं. ६ वा. मोटारीने बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेडकडे प्रयाण. सायं. ६.३० वा. राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्ष प्रवेश सोहळा स्थळ- बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेड. सायं. ७.३० वा. मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. रात्री ८ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण करतील.

## ग्रामीण भागातील खंडित केलेला वीजपुरवठा तातडीने सुरू करा

**नांदेड** - महावितरण कंपनीची ज्या गावांकडे दहा टक्के पेक्षा कमी झाली आहे विज बिल वसुली झाली आहे. अशा गावांचा संपूर्ण वीजपुरवठा खंडित करण्याचा सपाटा महावितरण सुरू केला असून नांदेड तालुक्यातील अनेक गाव अंधारात चाचपडत आहेत. त्यामुळे जनतेला अंधारात चाचपडत ठेवणाऱ्या महावितरण विरुद्ध तीव्र आंदोलन करण्यात येणार असून महावितरण ने तातडीने खंडित केलेल्या वीजपुरवठा सुरू करावा अन्यथा परिणामाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असा सज्जाद इशारा शिवसेनेचे तालुका प्रमुख सुनिल पाटील कदम मरळककर यांनी दिला आहे. ज्या गावांची वीज बिल वसुली १० टाक्या पेक्षा कमी आहे अशा संपूर्ण गावाचा वीजपुरवठा खंडित करण्याचा सपाटा महावितरणकडून लावण्यात आला आहे . नांदेड तालुक्यातील मरळक खुर्द,मरळक बुद्रुक , चिखली बुद्रुक , चिमेगाव, खडकुत, वासरी या गावांची वीज बिल वसुली १० राज्यापेक्षा कमी असल्यामुळे या सहा गावांचा संपूर्ण वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठे परिणाम झाले आहेत. पिण्याच्या पाण्यापासून तर दळण्यापर्यंतचे सगळे प्रश्न निर्माण झाले असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांच्या संयमाचा महावितरण ने अंत न पाहता खंडित केलेला वीज पुरवठा तातडीने सुरू करावा अन्यथा महावितरण विरोधात चिखली फेको आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुनिल पाटील कदम यांनी दिला आहे.



## गंगणबीडात पालखी, शिव-पार्वती विवाहसोहळा,चैत्र यात्रेचे आयोजन

**आदमपूर** -नायगाव तालुक्यातील प्रसिद्ध व जागृत देवस्थान असलेल्या श्रीक्षेत्र गंगणबीड येथे आंबली-बारसी निमित्त रविवार दि.२९ ते मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ या कालावधीमध्ये पालखी उत्सव शिव-पार्वती विवाहसोहळा व चैत्र यात्रा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती देवस्थान समिती कडून देण्यात आली आहे. श्रीक्षेत्र गंगणबीड हे अतिशय जाज्वल्य आणि प्राचीन देवस्थान आहे. शिखर शिंगणापूरनंतर इथल्या देवस्थानावर भाविकांची प्रचंड श्रद्धा आहे.सरविवारी २९ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता देवस्थानचे मुख्य पुजारी भागवत अप्पा स्वामी यांच्या निवासस्थानी शिव-पार्वतीचे विधिवत महाभिषेक आरती होऊन बँड-बाजा पथक, हलगी-सनई व भजनी मंडळीच्या निनादात वाजत- गाजत गावातील मुख्य रस्त्याने शिव-पार्वती पालखी सायंकाळी ८ वाजता हनुमान मंदिर येथे पोहचेल. तिथेही पुनश्च विधिवत महाभिषेक-आरती केल्यानंतर पालखी रात्री ९ वाजता पारंपरिक वाद्याच्या गजरात श्रीक्षेत्र महादेव मंदिरात पोहचेल.

# किनवट तालुक्यात रामनवमी उत्साहात; शोभायात्रा, महाप्रसादाने वातावरण भक्तिमय

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २८ मार्च-**

तालुक्यासह शहरात रामनवमी निमित्त प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिभावात आणि शांततेत साजरा करण्यात आला. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. शहरातील प्रमुख मंदिरे व रस्ते भगव्या पताकांनी सजविण्यात आले होते.

शहरातील श्रीराम मंदिरात पहाटे काकडा आरतीने उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर महाअभिषेक, पूजन व आरती पार पडली. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दर्शनानंतर भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.

रामनवमीच्या निमित्ताने सकाळी भगवे वस्त्र परिधान करून आणि वाहनांवर भगवे ध्वज लावून मोटरसायकल रॅली काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली 'जय श्रीराम'च्या जयघोषात पार पडली. दुपारी बारा वाजता रामलल्लाच्या जन्माचा सोहळा गुलाल उधळत आणि मंत्रोच्चारात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे दहा हजारांहून अधिक भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल-ताशा, डीजे, झांकी आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक रंगतदार झाली. फटाक्यांच्या आतषबाजीने शहर उजळून निघाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच रात्री गावातून श्रीरामांची पालखी मिरवणूक काढण्यात आली, ज्यात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. समाजात शांतता, ऐक्य आणि सद्भावना कायम राहावी, हीच प्रभू श्रीरामांच्या चरणी प्रार्थना करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

शहरातील साईबाबा मंदिरासह विविध भागांतही रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. हनुमान चौक येथे भाविकांसाठी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीराम मंदिर संस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रामभक्तांनी विशेष परिश्रम घेतले. पोलीस प्रशासनानेही चोख बंदोबस्त ठेवत उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

दरम्यान, रामनगर परिसरातही रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार भीमराव केराम यांनी श्रीराम मंदिरात दर्शन घेऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन समाजासाठी मार्गदर्शक असून, त्यांच्या विचारांमुळे समाजात ऐक्य व सद्भावना वृद्धिंगत होते, असे ते म्हणाले.

या प्रसंगी नगराध्यक्षा सुजाता येड्रलवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नगरसेवक तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री पालखी मिरवणुकीने उत्सवाची सांगता करण्यात आली.

# पिंपळगाव येथील श्री दत्त मंदिर संस्थानास ५० लक्ष रुपये मंजूर: आ.कोहळीकर



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. २८ मार्च-**

हदगाव तालुक्यातील मौजे पिंपळगाव येथील श्री दत्त मंदिर संस्थान हे तालुक्यासह पूर्ण पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. या ठिकाणी महाराष्ट्र राज्यासह इतरही राज्यातील भक्तांचे मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम, प्रवचन,राम- कथा दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. सदरील तीर्थक्षेत्र हे 'ब ' दर्जाचे असून सध्या रामनवमी यात्रेनिमित्त आयोजित भव्य-दिव्य सांस्कृतिक महोत्सवासाठी राज्याचे पर्यटन व राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई यांनी ५० लक्ष रुपयाचा निधी तात्काळ मंजूर केला असून आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व प्रयत्नांना यश मिळाले असून या निधीचा परिसरातील भाविक भक्तांच्या सोयीसाठी व विकास कामांसाठी मोठी मदत होणार असून भाविक भक्तांमधून समाधान व्यक्त होत आहे. या मंजुरीबाबतचे अधिकृत पत्र परमपूज्य गो. व्यंकट स्वामी महाराज यांना सर्वांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आले. यावेळी उपस्थित भक्तगणांना निधीबाबत सविस्तर माहिती आ. कोहळीकर यांच्याकडून देण्यात आली. परिसरातील संत - महंत पंचक्रोशीतील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते. मंजूर निधीमुळे रामनवमी उत्सव अधिक भव्य आकर्षक व सुव्यवस्थित पद्धतीने साजरा झाला असून तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासास मोठी मदत देखील होणार आहे.

# नागेली येथे 'आकाशवाणी नांदेड'चा श्रोतासंवाद मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २८ मार्च-**

मुदखेड तालुक्यातील नागेली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, नुकताच आकाशवाणी नांदेड केंद्राचा 'श्रोता संवाद मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला.

या माध्यमातून आकाशवाणीने ग्रामीण भागातील श्रोत्यांशी थेट संवाद साधत, शेती, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाची सुरुवात शहीद दिनानिमित्त क्रांतीकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी आकाशवाणी नांदेडचे कार्यक्रम अधिकारी राहुल आत्राम आणि प्रसिद्ध निवेदक मधुकर गजभारे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत



पुष्पहार व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुमधुर स्वागत गीताने करण्यात आले.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना कार्यक्रम अधिकारी राहुल आत्राम म्हणाले की, विद्यार्थी हा पालक आणि शिक्षकांच्या संस्कारातूनच घडत असतो. शाळा ही सुजाण नागरिक तयार करण्याचे पवित्र ठिकाण आहे. शाळेतील शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे त्यांनी विशेष कौतुक केले. तर निवेदक मधुकर गजभारे यांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत, निसर्गरम्य शाळा पाहून मन प्रसन्न झाल्याची भावना व्यक्त केली.

**शेतकरी व महिलांशी सुसंवाद**

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे गावातील महिला बचत गट आणि प्रगतीशील शेतकऱ्यांशी साधलेला संवाद. यावेळी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या, ज्यात शेतीतील कष्ट, आधुनिक तंत्रज्ञान आणि त्यातून मिळणारे उत्पन्न यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महिला बचत गटांनीही आपले अनुभव कथन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका धर्मश्री दु. मो. लोणे-लहानकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दोन-तीन वर्षांपासून नागेली येथील विद्यार्थी आकाशवाणीच्या 'गंमत-जंमत' या कार्यक्रमासाठी नियमित सादरीकरण करत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'पाणी थेंबे थेंबे वाचवा' ही नाटिका आणि 'चवदार तळ्याचे पाणी' ही कविता सादर केली होती. या यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संभाजी गव्हाणे, उपाध्यक्ष विजयकुमार शिंदे, चेअरमन काशीराम कुराडे, पोलीस पाटील यशवंतराव शिंदे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागराज कांबळे यांनी केले, तर आभार राजेश टोम्पे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वीणा कदम, सुचिता रासवंते, कविता रासवंते, दत्ता रासवंते आणि शिवप्रसाद यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भारतामधील पहिला जनरेशनल विल इव्हेंट

**छत्रपती संभाजीनगर** – महाराष्ट्रातील ठाणे येथील दुय्यम निबंधक कार्यालयात एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कायदेशीर घटना घडली. एका कुटुंबातील तीन पिढ्या – आजी, तिचा मुलगा आणि तिचा नातू – यांनी एकाच दिवशी आपापल्या स्वतंत्र मृत्युपत्राची नोंदणी केली. हा उपक्रम भारतातील पहिला जनरेशनल विल इव्हेंट असल्याचे मानले जात आहे.प्रत्येक मृत्युपत्र भारतीय कायद्यानुसार आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करून तयार करण्यात आले असुन त्याची कायदेशीर अंमलबजावणी व नोंदणी करण्यात आली. एका कुटुंबातील सलग तीन पिढ्यांनी एकाच दिवशी मृत्युपत्र नोंदणी करणे हे वारसा नियोजनाबाबत जागरूकतेचे एक दुर्मिळ उदाहरण मानले जात आहे. भारतामध्ये मालमत्ता आणि वारसा विषय अधिक गुंतागुंतीचे होत असतानाही मृत्युपत्र तयार करण्याबाबत फारशी आस्था दिसुन येत नाही. अनेक कुटुंबे गैरसमज, अज्ञान किंवा जागरूकतेच्या अभावामुळे मृत्युपत्र करण्याचा विषय टाळतात.

### सॅमसंगकडून गॅलेक्सी ए ५७ ५जी आणि गॅलेक्सी ए३७ ५जी लाँच

**छत्रपती संभाजीनगर** – सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलेक्सी ए सिरीजमधील नवीन स्मार्टफोन्स गॅलेक्सी ए ५७ ५जी आणि गॅलेक्सी ए३७ ५जी लाँच केले. गॅलेक्सी ए सिरीज फोटोग्राफी, कार्यक्षमता, एआय–सक्षम दैनंदिन वैशिष्ट्ये आणि टिकाऊपणाला प्राधान्य देणाऱ्या तरूण वापरकर्त्यांसाठी डिझाइन करण्यात आली आहे.

### जॅक्सन ग्रुपची सौरव गांगुलीसोबत भागीदारी

**नवी दिल्ली :** भारतातील आघाडीची ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील कंपनी जॅक्सन ग्रुपने आज भारताच्या क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि प्रख्यात नेतृत्व सौरव गांगुली यांच्यासोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. भारत वेगाने आपल्या अक्षय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने पुढे जात असताना ही भागीदारी झाली आहे. नाविन्य, व्याप्ती आणि शाश्र्वत उपायांद्वारे देशाच्या ऊर्जा संक्रमणाला चालना देण्याच्या जॅक्सनच्या कटिबद्धतेला यामुळे अधिक बळकटी मिळते. आठ दशकांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या जॅक्सन ग्रुपने नेहमीच विश्र्वास, लवचिकता आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या नाविन्यपूर्णतेला प्राधान्य दिले आहे. गांगुली यांचे परिवर्तनशील नेतृत्व आणि नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या क्षमतेतून प्रेरणा घेत, कंपनीचे उद्दिष्ट भविष्यवेधी ऊर्जा आणि पायाभूत सुविधांचे उपाय स्पष्टपणे आणि उत्कृष्टपणे अंमलात आणणारा एक विश्र्वासार्ह भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करणे हे आहे.

### फॅशन, फेम आणि मॅक्स फॅशनची वीस वर्षे पूर्ण

**मुंबई** – सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ यांचा सहभाग दोन दशके, लाखो वॉर्डरोब आणि असंख्य 'स्टाईल मोमेंट्स'नंतर 'मॅक्स'ने केवळ आपला वर्धापनदिन साजरा केला नाही, तर भारतातील सर्वात प्रतिष्ठित रॅम्पपैकी भव्य अशया फॅशन सोहळ्याचे आयोजन केले. लॅक्मे फॅशन वीकमध्ये आ–पले स्वागत आहे, ते ही मॅक्सचा अनोख्या अंदाज. दिवे मंदावले. संगीताचा सूर मंद झाला. अगदी त्याच क्षणी रनवे केवळ रनवे राहिला नाही, तर तो एका वेगळ्याच अनुभवात रूपांतरित झाला. एकूण ३५ विविध लूक्सच्या माध्यमातून जे काही सादर झाले, तो फक्त पारंपरिक असा फॅशन शो नव्हता. तर आजचा तरुण भारत प्रत्यक्षात कशा प्रकारे पेहराव करतो याचे जिवंत व स्पंदनशील चित्र होते.

### न्युट्रिकाने वेलनेस पोर्टफोलिओचा विस्तार केला

**मुंबई:** भारतातील सर्वात वेगाने वाढणारा 'वेलनेस फर्स्ट' एफएमसीजी ब्रँड बीएन ग्रीटेकचा जीवनशैली आणि वेलनेस ब्रँड 'न्युट्रिका'ने, न्युट्रिका पीनट बटर लाँच करत पीनट बटर श्रेणीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ही रेंज दैनंदिन आरोग्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चव, गुणवत्ता आणि उपयुक्तता यांचा मेळ घालणारा एक परिपूर्ण वेलनेस पोर्टफोलिओ तयार करण्याच्या दिशेने ब्रँडचे पुढचे पाऊल आहे. न्युट्रिका पीनट बटर आता दिल्ली, मुंबई, पुणे आणि चंदीगडसह १४ शहरांमधील जनरल ट्रेड स्टोअर्समध्ये (किरकोळ दुकानांमध्ये) उपलब्ध आहे.

# माणुसकीने वागल तर लोक कल्याणकारी रामराज्य: अतुल चव्हाण

## नाथ आश्रमात रामनवमी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २८ मार्च :** श्री–क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रमात रामनवमी उत्साहात व भक्तीमय वा–तावरणात साजरी करण्यात आली. तसेच संत–महंतांच्या सान्निध्यात भव्य संगीतमय नवनाथ कथेच्या कार्यक्रमाचे ध्वजारोहण संपन्न झाले.

नाथ आश्रमाच्या मठाधिपती नाथ योगिनी अक्का महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६ दरम्यान संगीतमय नवनाथ कथेचे आयोजन करण्यात आले या कथेचे कथाकार महाराष्ट्र भूषण अडबंगनाथ संस्थान प्रमुख स्वामी अरुण गिरी महार–ाज भामाठाण तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर यांच्या मधुर वाणीतून



संपन्न होणार आहे.

गुरुवार, दि २६ मार्च २०२६ रोजी रामनवमी निमित्त विशेष कार्यक्रम पार पडला. आणि ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी नाथ योगिनी अक्का महाराज यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रभू श्रीरामचंद्रांच्या आदर्शांचे अनुकरण प्रत्येकाने करावे. शांतता, संयम आणि मर्यादा पाळून जीवन जगावे. देव, देश आणि धर्म यांची सेवा करावी. प्रामाणिकपणा व कष्ट यांची साथ असेल तर जीवन मंगलमय होईल आणि प्रभू रामचंद्रांचा आशीर्वाद लाभेल.

या कार्यक्रमास टाका आश्रमाचे प्रमुख श्री विद्या वामदेवतिर्थ स्वामी, छत्रपती संभाजी नगर जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभाग चे मुख्य अभियंता . अतुल चव्हाण पाटील, यांच्या प्रमुख उपस्थितीत रामनवमी व नाथ कथेच्या ध्वजस्तंभाचे पूजन करण्यात आले त्यानंतर आपले विचार मांडताना आपल्या जीवनात माणसाने माणुसकीने वागल्यास लोक कल्याणकारी राम राज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले.

भारतीय जनता पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे खुलताबाद भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, वेरूळ ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ ह भ प नारायण भांबर्डे उद्योजक ईसाराम मातकर संतोष करपे पाटील. कॉन्ट्रॅक्टर संतोष गायकवाड. कैलास मिसाळ. बजरंग ग्रुप प्रमुख राजेंद्र घोरपडे सामाजिक कार्यकर्ते सतीश लोखंडे ह भ प तुकाराम मते दामू अण्णा गवळी यांच्यासह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सांगता महाप्रसाद–ाने करण्यात आली. तसेच संगीतमय नवनाथ कथेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक भाविक भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाथ आश्रमाच्या वतीने नाथ योगिनी अक्का महाराज व नाथ भक्त मंडळाचे वतीने केले आहे.

## मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे : रविंद्र चव्हाण

**छत्रपती संभाजीनगर** – महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे असे गौरवोद्गार भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे काढले. मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा नुकताच रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र भवन वास्तूच्या विस्तारासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याबाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसच्या दोन दिवसीय दौऱ्यात उच्चस्तरीय मान्यवरांच्या भेटीगाठी घेत भारत–मॉरिशस संबंध अधिक दृढ केले. या दौऱ्यात रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत भारत–मॉरिशस मैत्री, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, –ख आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे, असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच भारताने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## सेविकांमध्ये मासिक पाळी आरोग्य जागरूकता



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २८ मार्च :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या 'उजास' उपक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे 'पीरियड मेळा'चे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता व्यवस्थापनाबाबत तळागाळात जागरूकता वाढवण्याबरोबरच क्षमता विकासावर फोकस करण्यात आला. कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील २२८ आशा सेविका सहभागी झाल्या.

उपक्रमाचा मुख्य उद्देश आशा कार्यकर्त्यांना वैज्ञानिक, अचूक व प्रवादरहित माहिती देऊन त्यांना समुदायातील प्रभावी आरोग्य दूत म्हणून सक्षम करणे हा होता. माहितीपूर्ण स्टॉल्स, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक चर्चांद्वारे सुरक्षित पद्धती, स्वच्छता व्यवस्थापन आणि संसर्ग प्रतिबंध याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बारुरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, उप शिक्षण अधिकारी क्षीरसागर, मनपा उपायुक्त पंजाबराव खानसोले, आशा जिल्हा समन्वयक संगीता डवरी आणि डीएमएम आयबीसीबी अल्ताफ जिकारे उपस्थित होते. मान्यवरांनी आशा सेविकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत उपक्रमाचे कौतुक केले.

'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर यांनी सांगितले की, जागरूकतेपलीकडे जाऊन शाश्र्वत आरोग्य परिसंस्था उभारण्यावर भर दिला जात आहे. कार्यक्रमाचा समारोप आशा सेविकांना समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे आवाहन करत करण्यात आला.

## पैठणला सम्राट शालिवाहन जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २८ मार्च :** पैठण तालुका समस्त कुंभार समाज संघटनेच्या वतीने शककर्ता सम्राट राजा शालिवाहनांची जयंती चैत्र शुद्ध दशमी ला मोठ्या उत्साही वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.यावेळी महाराष्ट्रातुन शेकडो कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

जुन्या पैठण मधील विजयी तिर्थ स्तंभ उद्यानात कार्यकर्त्यांनी सम्राट शालिवाहनांच्या प्रतिमेस पुष्पवृष्टी करून अभिवादन केले.यावेळी शालिवाहनांच्या जयजयकाराने परिसर दुमदुमुन गेला.



झेंडूजी महाराज मठात संपन्न झालेल्या कार्यक्रमात राज्यभरातुन आलेल्या कार्यकर्त्यांनी सम्राट शालिवाहनांच्या कार्यावर आपले मनो–गत व्यक्त केले.या प्रसंगी उप नगराध्यक्ष तुषार पाटील,संजय जोरले, रामदास इंगळे, नागनाथ कुंभार, शामराजे कुंभार, दत्ताजी डहाळसकर, खटावकर, जालिंदर पंजावाले, गणेश पंजावाले, सुर्यभान घोडके, निवृत्ती जाधव, गणेश रोकडे, मनोहर तांगडे, मुरलीधर तिडके, मनोहर मरकड, साखरचंद जाधव आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाने पैठणच्या बसस्थानकाला सम्राट शालिवाहन यांचे नाव देण्यात यावे, तसेच जुन्या पैठण मधील केंद्र सरकार च्या ताब्यात असलेल्या पालथी नगरीचा तात्काळ विकास करण्यासाठीची कार्यवाही करण्यात यावी आदि मागण्या यावेळी करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाऊसाहेब पंजावाले, सतिष दळे, राम पंजावाले, साहेबराव रोकडे, प्रमोद पंजावाले, भागवत रोकडे, रवी पंजावाले, विठ्ठल रोकडे, अजय पंजावाले, अशोक रोकडे, कल्याण पंजावाले, अंबादास अंबादास रोकडे, पंढरीनाथ खळदकर, प्रकाश शिर्के, कडुबा शिर्के विठ्ठल मरकडआदिंनी परिश्रम घेतले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भद्रा मारुती मंदिर बालाजीनगर बिडकीन येथे वर्धापन दिना निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २८ मार्च :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील बाल–ाजी नगर येथे भद्रा मारुती मंदिर तृतीय वर्धापनदिना निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा व श्री ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळा दि २६ मार्च पासून ह भ प प्रल्हाद महाराज महालकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे, या सप्ताह मध्ये भागवत कथा प्रवक्ते ह भ प भागवताचार्य गणेश महाराज मगर वाकलेकर, व्यासपीठ चालक ह भ प किशोर महाजन गावंडे,ह भ प ऋषिकेश महाराज महालकर,या सप्ताह मध्ये दि २६ मार्च ते ४ एप्रिल पर्यंत रोजी भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे तसेच रोज रात्री सात



ते नऊ या वेळेमध्ये कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे दि २६ रोजी ह भ प बबन महाराज नवपुते,पैठण,दि २७ रोजी कृष्णा महाराज मोगल निलजगाव,दि २८ रोजी ह भ प दिनेश महाराज बोडखे बाभुळगाव,दि २९ रोजी भागवताचार्य गणेश महाराज मगर वाकलेकर,दि ३० रोजी ह भ प दिलीप महाराज गटकळ पैठण,दि ३१ रोजी भागवताचार्य कृष्णा महाराज कोरडे गाढे जळगाव,दि १ एप्रिल रोजी ह भ प गजानन महाराज गायकवाड बुलडाणा,दि २ रोजी ह भ प रामायणाचार्य प्रल्हाद महाराज महालकर पैठण यांच्या काल्याचे कीर्तन सकाळी नऊ ते अकरा या वेळेत होईल नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी बिडकीन व परिसरातील भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताह लाभ घ्यावा असे आव्हान बालाजी नगर व समस्त गावकरी यांनी केले आहे, स्थळ भद्रा मारुती मंदिर बालाजीनगर बिडकीन ता पैठण

## महारक्तदान, रथयात्रा व ध्वजारोहणाने होणार महावीर जन्मकल्याणक महोत्सवाची सुरुवात



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २८ मार्च :** सकल जैन समाजातर्फे भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती २०२६ च्या वती–ने ३१ मार्च रोजी विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांसह महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. 'माझे शहर, माझी जबाबदारी' या थीमवर यंदाचा उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवाच्या निमित्ताने महारक्तदान, ध्वजारोहण व भव्य रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. आचार्य पुष्पदंतसागरजी, उपाध्याय विभंजनसागरजी, मुनिश्री प्रभावसागरजी, आर्यिका विनेहश्री माताजी, सुनयमती माताजी यांच्यासह विविध साधुसंतांची उपस्थिती लाभणार आहे. अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या नेतृत्वाखाली ६ पंथ एकत्र येऊन हा उत्सव साजरा केला जात आहे.

३१ मार्च रोजी सकाळी ६ वाजता शहरातील विविध भागांतून वाहन रॅली काढण्यात येऊन महावीर उड्डाणपुल येथे ध्वजारोहण होईल. त्यानंतर पैठणगेट येथून भव्य रथयात्रा निघणार असून विविध जैन मंदिरांचे रथ व पालख्या सहभागी होणार आहेत.

दरम्यान, २९ मार्च रोजी जेप–ीएल फायनल, ३० मार्च रोजी महिला सांस्कृतिक कार्यक्रम व जैन कॉन्सर्ट, तसेच आरोग्य शिबीर, अन्नदान, गो–चारा वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संध्याकाळी आरती व पाळणा सोहळ्याने महोत्स–वाची सांगता होईल.

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद–**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ६६/२०२६.
अर्जदार–
१)कौशल्याबाई पुंडलिक मानकर. ६५ वर्षे, धंदा. घरकाम,
२)योगेश पुंडलिक मानकर, वय. ४३ वर्षे, धंदा. शेती,
३)राजेश पुंडलिक मानकर,, वय, ४० वर्षे, धंदा, नौकरी, सर्व रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर
४)सविता जगन्नाथ पाटील, वय, ४५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. गट नं. १४७५, मंगलमुर्ती हौसिंग सोसायटी, चिखली, पो. रुपीनगर, जि. पुणे,
५)कविता राजेंद्र पाटील, वय.३८ वर्षे,धंदा.घरकाम, रा.भराडी, ता. जामनेर, जि. जळगांव.
– विरुध्द –
गैरअर्जदार– कोणीही नाही.
प्रकरण– वारस प्रमाण–पत्र मिळणे बाबत.
सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय.आर. जावळे,सोयगांव,ता.सोयगांव, जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत पुंडलिक तुळशिराम मानकर हे दि. १३/०१/२०२६ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत पुंडलिक तुळशिराम मानकर यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.
पुढील तारीख – २९/०४/२०२६.
आज दि. २८/०३/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले. आदेशांवरुन,
**विभागीय लिपीक,**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.)**
**सहाय्यक अधिक्षक,**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.)**
**प्रत:–**
**१)दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव नोटीस बोर्ड.**
**२)नगर पंचायत, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर..**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ६३/२०२६.
अर्जदार :–
१)शोभाबाई भास्कर शिंदे. ५५ वर्षे, धंदा, घरकाम,
२)गोपाल भास्कर शिंदे, वय. ३५ वर्षे, धंदा, मजुरी,
३)सागर भास्कर शिंदे, वय, ३१ वर्षे, धंदा, मजुरी, सर्व रा. रवळा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,
४)सुनिता विनोद पाटील, वय, ३७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. प्लॉट नं. ३९, इंद्रप्रस्थनगर, जळगांव, जि. जळगांव,
–विरुध्द–
गैरअर्जदार :– कोणीही नाही.
प्रकरण:– वारस प्रमाण–पत्र मिळणे बाबत.
सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय.आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत भास्कर साहेबराव शिंदे हे दि. ०९/०६/२०२१ रोजी मौजे. रवळा, ता. सोयगांव, जि. छत्रपती स ंभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं, १ ते ४ हे मयत भास्कर साहेबराव शिंदे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.
पुढील तारीखः २९/०४/२०२६.
आज दि. २८/०३/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले,
आदेशांवरुन,
**विभागीय लिपीक,**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव,)**
**सहाय्यक अधिक्षक**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव,)**
**प्रत :**
**१)दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव नोटीस बोर्ड.**
**२)ग्रुप ग्राम पंचायत, रवळा–जवळा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर..**

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर सोयगांव यांचे न्यायालयात. जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.६२/२०२६ नि. क्रं.
१) सुनिल अमृत गिरी, वय ७३ वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.
२) राजेश अमृत गिरी, वय ५८ वर्ष, धंदा वकिली, रा. वरीलप्रमाणे.
विरुद्ध – निल
प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.
सर्व संबंधिताम जाहिर प्रकटनाचे त्यात येते कई उपरोक्त अर्जदाराने पारस्प्रमाणपत्र मिळणेसाठी ड.सचिन सुनिल गिरी, रा.सोयगाव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत वत्सलाबाई अमृत गिरी पांचा दिनांक १०.०२.२०२६ रोजी मौजे आमखेड़ा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यु झा–लेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्र. १ से २ हे वारस आहे, असा अर्ज मा.न्यायलयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते २ हे मयत वत्सलाबाई अमृत गिरी यांचे वारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय वारसप्रमाणपरासाठी आवश्यकता आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपशसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल
आजरोजी दिनांक २८.०३.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे,
पु. ता. ३०/०४/२०१६
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**
**प्रतिलीपी–**
**१)नोटीसबोई, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव**
**२) ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.**

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९/२०२६, नि. क्रं.
१) किशोर लक्ष्मीनारायण थेपडे, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. नगरदेवळा, ता. पाचोरा, जिल्हा जळगाव, ह.मु. किन्ही, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.
विरुद्ध– निल
प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत कवेराबाई सिताराम थेपडे यांचा दिनांक ०५.११.१९९७ रोजी मौजे आदर्श नगर, जळगाव, जिल्हा जळगाव येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत कवेराबाई सिताराम थेपडे यांचे वारस असुन त्यांना शेतजमीन गट क्र. १९० क्षेत्र ३ हे ८७ आर व गट क्र. २०१ क्षेत्र ३ हे ८८. आर मौजे किन्ही ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मालकी हक्कात वारस–द्वारे नाव लावण्यासाठी सदर वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल
आजरोजी दिनांक २८.०३.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
आदेशानुसार
पु. ता. ३०.०४.२०२६
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**
**प्रतिलीपी :–**
**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.**
**२) ग्रामपंचायत कार्यालय किन्ही, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर**